राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२१-२२

## प्राथमिक शिक्षक गट

नवोपक्रम

# ‘पक्का पाया पहिलीचा’

......जाणीव पहिला आकार देताना


उपक्रमकर्ता : श्री. सचिन कुंडलिक देसाई
( उपशिक्षक )
शाळा : विद्या मंदिर बशाचामोळा
ता. भुदरगड जि. कोल्हापूर
संपर्क क्र. : ९४२११४२९०

# ▪ नवोपक्रमकर्ता परिचय



- **नवोपक्रम शीर्षक**- 'पक्का पाया पहिलीचा ......जाणीव पहिला आकार देताना'
- **नवोपक्रम कर्त्याचे नाव** – श्री. सचिन कुंडलिक देसाई
- **पद**- उपशिक्षक.
- **कार्यालय** – विद्या मंदिर बशाचामोळा
  ता. भुदरगड जि. कोल्हापूर
  यु डायस क्र.-27340961403
- **नवोपक्रम गट** – प्राथमिक शिक्षक गट
- **कायमचा पत्ता** – मु. पो. मिणचे खुर्द
  ता. भुदरगड जि.कोल्हापूर
  पिन-416223
- **शैक्षणिक अर्हता** – M.A.D.ed
- **नोकरी रुजू दिनांक** – 10/11/2005
- **एकूण सेवा** – 16 वर्षे
- **संपर्क क्रमांक** – 9421114290
- **ई-मेल आय डी** – skdesai011@gmail.com
- **नवोपक्रमसाठी लागलेला कालावधी** – 6 महिने
- **नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या** - 32

# प्रास्ताविक

आदरणीय मान्यवर,

सस्नेह वंदे !

माझा नवोपक्रम आपणासमोर सादर करण्यापूर्वी माझे मनोगत, माझे दोन शब्द आपणासमोर मांडू इच्छितो. अगदी खरे सांगायचे तर... हा केवळ एक उपक्रम नव्हता तर होती एक आनंददायी शिक्षण यात्रा ! या संकटकालीन वादळात पहिली झेप घेताना चिमुकल्यांच्या पंखाना बळ देणारी जणू एक अभ्यास जत्रा ! आपण सारेच जाणतोय, आपण सारेच अनुभवतोय आणि आपण सारेच लढतोय ! या संकटाविरुध्द आणि या शिक्षणाच्या अखंडित प्रवाहासाठी ! कोरोना आपत्तीमुळे मानवी जीवनाच्या सर्व घटकावर अन् क्षेत्रावर होत असलेले दूरगामी परिणाम आपण पाहत आहोत, अनुभवत आहोत. आपल्या शिक्षणप्रवाहातही यामुळे गेली अनेक दिवस अडसर निर्माण होऊन शिक्षण संक्रमण कार्यात मर्यादा येत आहेत. पर्यायाने ही गंभीर परस्थिती पाहता आपण आज काळानुरुप अन् परिस्थितीनुरुप वेगळी भूमिका करणे ही काळाची गरज बनली आहे. शासनाने देखील 'शाळा बंद ठेवणे' अपरिहार्य झाले असले तरीही विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे चालू ठेवता येईल ? यासाठी विविध प्रयत्न आणि कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले आहे. शिवाय शिक्षकांनाही शिक्षण चालू ठेवण्यासाठी स्वयंस्फूर्तीने विविध प्रयत्न आणि नवोपक्रम आपल्या शाळेत करण्यासाठी प्रवृत्त केले. या शासनाच्या सादला दिलेला प्रतिसाद म्हणजेच या लॉकडाऊन काळात १ ली सारख्या पायाभूत कक्षासाठी... एक पर्यायी कार्यक्रम म्हणून वाटचाल केलेला आपणासमोर या निमित्ताने सादर करत असलेला **'पक्का पाया पहिलीचा ......जाणीव पहिला आकार देताना'** हा नवोपक्रम.

या आपत्तीकाळात ऑनलाईन शिक्षणाचा प्राधान्याने वापर होत असला तरी इयत्ता १ ली या पायाभूत कक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीचा वापर करणे वास्तविकदृष्ट्या वयाचा आणि क्षमतेचा विचार करता प्रारंभिक स्तराच्या दृष्टीने अयोग्य वाटत होते. शिवाय पहिलीचा वर्ग म्हणजे जणू शिक्षणाचा पायाच. विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने शैक्षणिक आणि सर्वांगीण विकास करायचा असेल, तर हा पाया मजबूत असणे खूप आवश्यक आहे. पायाभूत भाषिक क्षमता, अंकगणितीय साक्षरता व अध्ययन निष्पती या गोष्टी साध्य करायच्या असतील तर त्यायोग्य वातावरण आणि संधी उपलब्ध होतील असे नवोपक्रम हाती घेणे क्रमप्राप्त ठरते. या नवोपक्रममुळे आपत्ती काळातही मुलांना एक चांगले व्यासपीठ प्राप्त झाले. जणू शिक्षणरुपी पहिला ज्ञानकण टिपताना चिमुकल्यांच्या पंखांना बळकटी प्राप्त झाली. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या समन्वयातून साकार झालेला हा उपक्रम राज्यातील अन्य शाळांना देखील अनुकरणीय आणि दिशादर्शक ठरला. या नवोपक्रमाच्या अनुषंगाने ऑनलाइन कार्यशाळा, वेबिनार आणि सेमिनार मधून राज्यभरातील शिक्षकांना या नवोपक्रम अंतर्गत घ्यावयाच्या विविध कृती व प्रात्यक्षिक बाबत मार्गदर्शन व प्रेरित करण्यात आले. या अंतर्गत घेतलेले कृती उपक्रम भविष्यकालीन उपयुक्त ठरतील असे आहेत.

मला आनंद आहे की, या आपत्ती काळातही इयत्ता १ ली सारख्या पायाभूत कक्षेस पहिला आकार देणे, तयारी घेणे हे आवाहन होते, पण या नवोपक्रममुळे यशस्वी झालो. स्पर्धेच्या निमित्ताने आपणासमोर थोडक्यात सादर करण्याचा माझा हा एक अल्प प्रयास !

**श्री. सचिन देसाई**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | नवोपक्रमाचे शीर्षक | ३ |
| २ ) | नवोपक्रमाची गरज व महत्व | ४ |
| ३ ) | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ६ |
| ४ ) | नवोपक्रमाचे नियोजन | ७ |
| ५ ) | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १३ |
| ६ ) | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती ( उद्दिष्टानुसार ) | २९ |
| ७ ) | समारोप | ३२ |
| ८ ) | संदर्भसूची व परिशिष्टे | ३३ |

## ❑ १. नवोपक्रमाचे शीर्षक

# पक्का पाया पहिलीचा

## ......जाणीव पहिला आकार देताना




**SCAN OR CLICK**

उपक्रमाची माहिती व्हिडिओ स्वरूपात पहा

लिंक :

https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzNRRI9glolHet06XTww1cr

# ❑ २. नवोपक्रमाची गरज व महत्व

## ▪ उपक्रम निवडण्याचे कारण :-

गतवर्षी पासून सारे विश्व एका नव्या आव्हानाला सामोरे जात होते. कोरोना आपत्तीमुळे मानवी जीवनाच्या सर्व घटकावर अन् क्षेत्रावर दूरगामी परिणाम झालेत. शिक्षणासारखे पवित्र क्षेत्रही याला अपवाद राहिले नाही. एप्रिल २०२० पासून कोरोना महामारीमुळे शाळा बंद झाल्या. ज्ञानाचा हा अखंड वाहणारा झरा जणू कोरडा पडू लागला मग, शासनानेही यासाठी कंबर कसली. विविध माध्यमाद्वारे शिक्षणाची ज्योत तेवत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आम्हां शिक्षकांनाही प्रेरित केले. यावर्षीचे नवीन शैक्षणिक सत्र सुरु झाले तरी संकट टळले नव्हते. शाळा सुरु होणे शक्य नव्हते. शिक्षणप्रवाहातही यामुळे अनेक दिवस अडसर निर्माण होऊन शिक्षण संक्रमण कार्यात मर्यादा येत होत्या. आमच्या ग्रामीण भागात पुरेसे नेटवर्क उपलब्ध नाही. ऑनलाईन शिक्षणासाठी सर्वच पालकाकडे स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत, पर्यायाने प्रत्येक मुलाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संवाद साधणे कठीण होऊन बसले होते. शिवाय जरी मोबाईल सुविधा असली तरी त्याचा अतिवापर होईल अगर तशी सवय लागेल अशी आरोग्याच्या दृष्टीने हितकारक नसल्याची भीती जाणवत होती. अशा काळात पहिलीच्या मुलांची पहिली जडणघडण करणे, योग्य आकार देणे आदर्श विद्यार्थी आणि वर्ग घडवणे हे एक आवाहन होते, म्हणूनच ही गंभीर परस्थिती पाहता काळानुरूप अन् परिस्थितीनुरूप वेगळी भूमिका करणे ही काळाची गरज बनली. या वर्षी माझ्याकडे इयत्ता १ ली चा वर्गशिक्षक म्हणून काम करायचे होते. शिक्षणाचा श्री गणेशा करणाऱ्या मुलांना सहज सुलभ आणि आनंददायी प्रवासयात्रा सुरु करायची होती. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून समूह अध्यापन पद्धतीचा स्वीकार करत **'पक्का पाया पहिलीचा .... जाणीव पहिला आकार देताना'** हा नवोपक्रम हाती घेतला.

इयत्ता १ ली कक्षेचा आणि यातील विद्यार्थी वयोगटाचा मानसशास्त्रीय विचार करता कृतीयुक्त कार्यक्रमातून आंतरक्रिया निर्माण होतील अशी पद्धती वापरणे आवश्यक होते. सुरक्षित वातावरणात पायाभूत भाषिक क्षमता, अंकगणितीय साक्षरता व अध्ययन निष्पती या गोष्टी साध्य करण्यासाठी सुयोग्य वातावरण आणि संधी उपलब्ध करुन देण्यासाठी पालकांच्या सहकार्याने मुलांचा पाया पक्का करण्यासाठी सूत्रबद्ध असा आनंददायी उपक्रम घेणे आवश्यक वाटले.

मुलांचा प्रत्यक्ष सहभाग, भाषिक उपक्रम व गणितीय प्रात्यक्षिके यातून त्यांचा अपेक्षित शैक्षणिक विकासासोबत आत्मविश्वास, सृजनशीलता, अध्ययन रुची, विचारशीलता यासारख्या भावनिक विकासास देखील संधी प्राप्त होणार होती. कोरोना काळात शाळा बंद असताना मुलांना शैक्षणिक कृतीत गुंतवून ठेवणे आवश्यक होते यासाठी सदर ज्ञानरचनावादी उपक्रम हाती घेण्यात आला.

- ## उपक्रमाचे वेगळेपण:-

कृतीतून, अनुभवातून अगर प्रात्यक्षिक कार्यातून मुलांना शिकण्याची संधी देणारा आणि मुलभूत संबोध सहजपणे निर्माण करणारा हा उपक्रम आहे. वर्गअध्ययन अगर ऑनलाइन शिक्षा प्रणाली वापर करणे या पेक्षाही परिणामकारक व आनंददायी प्रणालीचा वापर करता आला. ज्ञानरचनावादावर आधारित उपक्रम अंतर्गत कृती समाविष्ट केल्याने पायाभूत ज्ञान, क्षमता दृढ होण्याबरोबर सृजनशीलता, कल्पकता या बरोबर तर्कशक्ती आणि विचारक्षमतेत वाढ झाली. मुलांच्या कृतीशील अध्ययन पद्धती बरोबर एक शिक्षक म्हणून आणि एक पालक म्हणून कोणती जाणीव ठेवायला हवी कोणता विचार करायला हवा याचे चिंतन करून देणारा हा मानसशास्त्रीय विचारधारा असणारा हा उपक्रम होता. आपत्ती काळात सदर नवोपक्रम अधिकतर समूह अध्यापन पद्धतीने घेण्यात आला. पालकांची भूमिका यात खूप महत्वाची होती. पालकांनी समांतर भूमिका पार पाडून सुयोग्य आंतरक्रिया निर्माण करण्यास सहकार्य केले. अध्ययन-अध्यापन यांचा संगम एका आनंदपूर्ण आणि मुक्त वातावरणात साध्य झाली. या उपक्रमांतर्गत विपुल प्रमाणात शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून जोड देण्यात आली. साहित्याचा वापर करून ज्ञानरचनावादी कृती करण्यास सांगितल्या त्यामुळे या आणीबाणीच्या काळातही शिक्षण संक्रमण प्रक्रियेला संजीवनी देणारा हा उपक्रम ठरला आहे.

- ## उपयुक्तता :-

या आपत्कालीन स्थितीत हा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा एक सुरक्षित मार्ग आहे. ऑनलाईन शिक्षणाला काही अडथळे व मर्यादा येतात तसे उपक्रमात आले नाहीत. १००% विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. पायाभूत क्षमता, पायाभूत भाषिक ज्ञान तसेच अंकगणितीय साक्षरता यांची तयारी योग्य प्रकारे झाली. या उपक्रमाअंतर्गत कृती-उपक्रम प्रारंभिक अवस्थेत खूप लाभदायक असल्याचे निष्कर्षात जाणवले नंतर याची सविस्तर माहिती माझ्या ब्लॉगसाईड व YouTube channel वर प्रसारित केली. या उपक्रमाचा राज्यातील अनेक शाळांनीही अनुकरणीय वापर केला. राज्यभरातील अनेक शिक्षक आणि पालकही या कार्यक्रमात सहभागी झाले. आवश्यक व शक्य त्या ठिकाणी ऑनलाइन शिक्षणाची माध्यमेही वापरण्यात आलीत यामुळे मुलांना याची एक नवी अनुभूती मिळाली. विषयांची पायाभूत तयारी चांगली झाली. मुलांच्यात गुणवत्तेसोबत आत्मविश्वास, क्रियाशीलता, सृजनशीलता व कल्पकता यात सुयोग्य प्रगती साधली. बालकांची शैक्षणिक प्रगती खुल्या वातावरणात साधता आली. या उपक्रमाच्या व शिक्षणप्रणालीच्या यशस्वीतेसाठी मी मुबलक प्रमाणत पूरक असे ई-साहित्य निर्मिती केली, सोबतच QR कोड च्या सहाय्याने वापरात सहजता व सुलभता आणली. ICT चा प्रभावी वापर करता आला. मुलांनाही याबाबत रुची व जिज्ञासा वाढली._विद्यार्थीकेंद्रित असणारा हा उपक्रम फलदायी ठरला. श्रावण, भाषण, वाचन व लेखन यासह गणितीय साक्षरता यांनी कौशल्ये यात वृद्धी करणारा हा उपक्रम ठरला. ऑनलाईन शिक्षण पद्धती यावर पूर्णतः अवलंबून न राहिलेने मुलांचे आरोग्य चांगले राहिले.

# ❑ ३. उपक्रमाची उद्दिष्टे

- कोरोना / लॉकडाऊन काळात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या प्राथमिक अवस्थेत अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या अडथळ्यांचा शोध घेणे.
- कोरोना / लॉकडाऊन काळात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची आरंभ काळात अध्ययन प्रक्रिया सहज, सुलभ आणि परिणामकारक होण्यासास्ठी विविध कृती कार्यक्रम तयार करणे.
- पायाभूत भाषिक क्षमता, अंकगणितीय साक्षरता व अध्ययन निष्पती या गोष्टी साध्य करण्यासाठी योग्य वातावरण आणि संधी उपलब्ध करून देणे.
- कृती-कार्यक्रम व विविध उपाययोजनांच्या माध्यमातून प्राथमिक अवस्थेत आरंभीच्या काळात मुलांमध्ये झालेल्या गुणात्मक आणि भावनात्मक बदलांची परिणामकता अभ्यासणे.

# ❑ ४. उपक्रमाचे नियोजन

उपक्रमाची कार्यवाही करण्यापूर्वी त्याचे कालबद्ध नियोजन करण्यात आले. नियोजनामुळे पुढील दिशा आखणे सहज सुलभ झाले, शिवाय संभाव्य समस्या व अडचणीवर यशस्वी उपाययोजना करण्यात आली. यामध्ये निरीक्षण पद्धतीचाही वापर करण्यात आला. संबधित घटकांशी चर्चा करण्यात आली.

## • पूर्वस्थितीचे निरीक्षण-

कोरोना महामारीमुळे या सर्वांना योग्य नवोपक्रमात म्हणजेच अध्ययन कृतीत गुंतवणे या प्रसंगी अत्यावश्यक बनले होते. इयत्ता पाहिलीचा वर्ग म्हणजे 'शिक्षणाचा श्री गणेशा' मुलांचे लेखन वाचन खऱ्या अर्थाने याच टप्प्यात सुरु होते. शिक्षणासाठी ऑनलाइन पद्धत सार्वत्रिक मानली जात होती. यात अनेक मर्यादा आणि अडथळे दिसू लागलेत. वरच्या वर्गातील मुलांना जशी ऑनलाईन शिक्षण पद्धती सहज वापरता येते तितकी या सर्वात लहान वयोगटासाठी विचार करणे अशास्त्रीय वाटू लागली. शिवाय सर्वच पालकांच्या जवळ स्मार्ट फोन नव्हते. जरी असते तरी या पायाभूत कक्षेसाठी मला हे एकमेव माध्यम वापरायचे नव्हते. लहान मुलांना पहिला आकार देणे, शिक्षणाची पहिली गोडी निर्माण करणे या सर्वात महत्वाच्या उद्धिष्ट प्राप्तीत कुठे तरी मर्यादा जाणवू लागल्या. शिवाय लहान मुलांच्याकडून अभ्यासाच्या कारणावरून मोबाइलचा गैरवापर अगर अतिवापर होत असल्याचे पालकांच्या कडून तक्रारी होत्या. यातूनच प्राधान्याने मुलांचे आरोग्य चांगले राहील यास्तव मोबाईल चा अतिवापर टाळून अध्ययन पूरक आणि अध्ययन सुलभ कृतीत मुले आनंदपूर्ण सहभागी होतील असा कार्यक्रम प्रथम सत्र पासून हाती घेणे अनिवार्य वाटलेने या नवोपक्रमाचे नियोजन ठरले.

## • पालकांशी संवाद तथा अनुभवी, तज्ञाशी पूर्वचर्चा-

पालकांना या नावोपक्रमाचे गरज, स्वरूप व अंमलबजावणी या अनुषंगाने चर्चा केली. शिवाय **शिक्षण प्रक्रियेचा एक आधारभूत घटक म्हणून या उपक्रमात कोणती जबाबदारी घ्यावी लागेल ? या आपत्ती काळात कोणती खबरदारी घ्यावी लागेल ? याचीही जाणीव** करून दिली. काही गोष्टी शालेय परिसरात समूह अध्यापन मध्ये घ्यायच्या होत्या तर काही गोष्टी घर अथवा घरच्या परिसरात करावयाच्या होत्या. लेखनपूर्व तयारी करता काही प्रात्यक्षिके मुलांच्याकडून करून घ्यावी लागणार होती. या सर्वात पालकांची भूमिका खूप महत्वाची होती. या आपत्ती काळात शिक्षण अखंडित आणि परिणामकारक घडवण्यासाठी पालकाची भूमिका खूप प्रभावी व जबाबदारीची होती त्याअनुषंगाने पालकांना कार्यक्रम अंतर्गत त्यांची विविध टप्प्यातील भूमिका समजावून देण्यात आली. **एक पालक म्हणून 'मुलं' घडवत असताना आपण कोणता विचार कोणती जाणीव ठेवायला हवी ? याचे शास्त्रीयदृष्ट्या विवेचन आणि मार्गदर्शन करण्यासाठी एक विशेष संवाद मालिका यु ट्यूब वर सुरु करण्यात आली.** पालकांना वेबिनार मध्ये सहभागी करून घेतले व नियोजन व कार्यवाही याबाबत चर्चा घडवून आणली. SWADHYAY वापराबाबत प्रात्यक्षिक माहिती दिली. अपेक्षित सहकार्य व प्रतिसाद यांचीही जाणीव करुन दिली. **इयत्ता पहिलीसाठी आदर्श काम केलेल्या अनुभवी शिक्षकांचे तसेच काही शिक्षणतज्ञाचा सल्ला देखील विचारात घेण्यात आला.**

- ## आवश्यक साधनांची निर्मिती व विचार-

या उपक्रमात **'लेखनपूर्व तयारी'** ही इ १ ली च्या स्तरातील सर्वात महत्वपूर्ण गोष्ट होती. याकरिता नवोपक्रम अंतर्गत नियोजित केलेल्या कृतियुक्त उपक्रमासाठी विभिन्न प्रकारचे साहित्य आणि साधने लागणार होती. यात घरात सहजपणे उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा प्राधान्याने आधिकतर वापर करण्याचा विचार करण्यात आला. याद्दष्टीने अशा सर्व वस्तूंची प्रथम यादी करण्यात आली. उदा. रांगोळी, बिया, शेंगा, शेंगदाणे, बिया, कागद, माती, पीठ, सुई, दोरा इत्या. त्या बाबत पालकांनाही कल्पना दिली. या सोबत काही साधने, अक्षर कार्डे, वाक्य पाट्या बनवाव्या लागणार होत्या. यासाठी सर्वात विशिष्टपूर्ण व प्रभावशाली अशा डिजिटल बुक निर्मितीचा वापर करण्याचे ठरविले. **या पूरक प्रोजेक्टसाठी आवश्यक स्लाईड्स, व्हिडिओ तथा इतर महत्वपूर्ण डॉक्युमेंटस तयार करण्यात आले. या डिजिटल बुक चा अधिक प्रभावशाली वापर करता यावा यासाठी त्याला QR कोड सुविधा देखील देण्यात आली. याशिवाय यास अनुसरून इतर ई-साहित्य, शैक्षणिक व्हिडिओ व ऑनलाईन अभ्यासमाला निर्मिती करणे आवश्यक होते. यासाठी स्वतः अनेक शैक्षणिक व्हिडिओंची व अभ्यासमालांची निर्मिती केली. सदर ई-साहित्य माझ्या राज्यभर वापर होत असलेल्या SMART EDUCATION या YouTube Channel व ब्लॉग वरही प्रसारित** केले. विशिष्टपूर्ण अक्षरकार्डे आणि शब्द्कार्डे तयार करण्यात आलीत. लेखनपूर्वतयारी साठी डॉटेड फॉन्टयुक्त प्रिंट्स तयार करण्यात आल्या त्या पुसून पुनः पुनः वापरता याव्यात यासाठी त्या LAMINATE करण्यात आल्या त्यामुळे पुसून पुन्हा पुन्हा वापरता येणे शक्य झाले. सदर साहित्याचा उपयोग राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठीही झाला. माझे काही स्वनिर्मित ई- साहित्य दीक्षा ॲपवरही उपलब्ध आहे.. मूल्यमापनाची आवश्यक ती साधनांची पूर्वतयारी केली. पूर्वचाचणी, उत्तर चाचणी व त्यांच्या निकालाचे विश्लेषणात्मक तुलना करणारे तक्ते तयार करण्यात आलेत. मूल्यमापनाची साधने व तंत्रे यासाठी आवश्यक ती सामुग्री करण्यात आली. माहिती संकलनासाठी नोंदतक्ते तयार करण्यात आले. नवोपक्रम अंतर्गत विविध कार्यक्रमांचे कालबद्ध नियोजनपत्रके करण्यात आलीत. उपक्रम कार्यवाहीत सदर सर्व साधनांचा व साहित्याचा चांगला उपयोग झाला.

- ## नवोपक्रमासाठी सहकार्य व मार्दर्शन -

या नवोपक्रमासाठी **शिक्षणाधिकारी मा. आशा उबाळे मॅडम, गटशिक्षणाधिकारी मा. दीपक मेंगाणे साहेब, शिक्षणविस्तार अधिकारी मा. प्रबोध कांबळे साहेब, केंद्रप्रमुख मा.आबा पसारे साहेब यांचे मार्गदर्शन** व प्रेरणा मिळाली. सदर नवोपक्रम अधिक प्रभावी कसा राबवता येईल ? यातील येणाऱ्या समस्या कश्या पद्धतीने सोडवत्या येतील ? याबाबत उपाय सुचवले. त्याचा उपक्रमास सकारात्मक लाभ झाला. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. संभाजी गोविंद पाटील (कोल्हापूर) व श्री. सुरेश शिंगणे सर (बुलडाणा) तसेच नवोपक्रम पुरस्कार्थी श्री सचिन यादव सर (सातारा) यांचेही वेळोवेळी या कार्यासाठी व नवोपक्रमासाठी मार्गदर्शन प्राप्त झाले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर चे **मा. प्राचार्य आय. सी. शेख साहेब, मा. रमेश कोरे व इतर सन्मानीय अधिव्याख्याते यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली.** अनुभवातून अनेक तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळत राहिले. याशिवाय या उपक्रमात सहभागी झालेल्या अनुकरण करत असलेल्या राज्यभरातील अन्य शिक्षक व पालक यांची वेळोवेळी विशेष ऑनलाईन वेबीनार तथा चर्चासत्र **आयोजित करून नवोपक्रमाची माहिती देत असताना इतरांचे नाविन्यपूर्ण कल्पना तसेच विचार ही विचारात घेण्यात आले. त्याचा उपयोग नवोपक्रम अधिक परिणामकारक होण्यासाठी झाला. इ पहिली साठी उल्लेखनीय काम करणाऱ्या अनुभवी तसेच तज्ञ शिक्षकांच्याशी** याबाबत सुसंवाद ठेवत उपक्रम अधिकाधिक प्रभावी करण्यासाठी अखंडित प्रयत्न ठेवलेत.

- ## करावयाच्या कृतींचा निश्चित केलेला क्रम :

1) ‘कोरोना’ आपत्ती काळात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या प्राथमिक अवस्थेत अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
2) प्राप्त परिस्थितीत समस्याचे निराकरण करण्यासाठी पालकांशी संवाद साधून आवश्यक कार्यक्रमांचे नियोजन करणे.
3) इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची आरंभ काळात अध्ययन प्रक्रिया सहज, सुलभ आणि परिणामकारक होण्यासाठी विविध कृती कार्यक्रम तयार करणे.
4) विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण होईल. पायाभूत भाषिक क्षमता व अंकगणितीय साक्षरता व अपेक्षित अध्ययन निष्पती साध्य होईल. अशा कृतीशील उपक्रमांची यादी करून त्यांचा नियोजनात समावेश करणे.
5) शाळेच्या पहिल्या दिवशी विविध कार्यक्रमाद्वारे ‘प्रवेशोत्सव’ साजरा करणे. ‘पहिले पाऊल’ सारखा आनंदपूर्ण कार्यक्रम शाळेत आयोजित करणे.
6) मुलांचा पायाभूत भाषिक विकास साध्य करण्यासाठी व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी ‘माझी ओळख’ हा कार्यक्रम घेणे.
7) लेखनपूर्व तयारीसाठी विविध साहित्याचा वापर करुन आवश्यक कृती आणि खेळ मुलांच्याकडून समूह अध्यापन केंद्रात अथवा पालकांच्या सहाय्याने घरी करून घेणे.
8) अंकांची ओळख आणि दृढीकरण यांच्यासाठी समूह केंद्रात गट पद्धतीने विविध मनोरंजक खेळ घेणे.
9) अंक कार्डाचा वापर करुन कल्पकतेने विविध रचनावादी कृती व खेळ यामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे.
10) काही विशिष्टपूर्ण अंककार्ड व शब्दकार्ड चा वापर करुन सहज, सुलभपणे वाचन लेखन सराव घेणे. शब्दनिर्मिती तसेच शब्दलेखन यांस साहित्य वापरातून वाव देऊन पायाभूत भाषिक क्षमता प्राप्त करणे.
11) शब्दतारका या QR कोड सुविधा असणाऱ्या डिजिटल बुक ची निर्मिती करून पायाभूत भाषिक क्षमतेची परिपूर्ण तयारी करून घेणे.
12) गणितीय साक्षरता निर्माण व्हावी यासाठी गणित पेटी तथा इतर साधनाचा वापर करत गणितीय खेळांची मांडणी करणे.
13) वाचन व लेखन याची आवड निर्माण होईल, सहजपणे संधी निर्माण होईल यासाठी परिसरात वाचन कट्टा निर्माण करणे.
14) स्मार्ट बोर्ड, स्मार्ट टी.व्ही. तथा स्मार्ट मोबाईल या सारख्या ICT साधनांची उपलब्धता करून त्यांच्या सहाय्याने प्रभावशाली आणि प्रभावशाली अध्ययन अनुभूती व आंतरक्रिया साध्य करणे. शासनाचा SWADHYA उपक्रमयाबबत विद्यार्थी व पालक यांना प्रात्यक्षिक माहिती देऊन सदर उपक्रम पूर्ण करून घेणे.

15) YouTube Channel चा वापर करून विशेष संवादपर व्हिडिओ मालिकाद्वारा उपक्रम अंतर्गत कृती कार्यक्रम यांची प्रात्यक्षिक स्वरूपात माहिती दाखवणे. राज्यभरातील इतर पालक व शिक्षक यांना याबाबत माहिती देऊन प्रेरणा देणे.

16) गणितीय भाषाचा सुयोग्य वापर होऊन गणितीय संबोध आणि साक्षरता दृढ व्हावी यासाठी संधी उपलब्ध करणे परिसरातील वस्तूंचा वापर आणि बेरीज वजाबाकी संबोध निर्मिती करणे.

17) लोकसहभागातून अध्ययन पूरक सुविधा आणि वातावरण निर्मिती करणे. 'वाढदिवस आमच्या मित्राचा' यासारख्या उपक्रम अंतर्गत कार्यक्रमातून वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

18) भाषण संभाषण आणि भावनिक विकास या करिता विविध नाट्यीकरण कार्यक्रम घेणे.

19) मुलांच्यात झालेल्या बदलांच्या नोंदी योग्य प्रकारे करून मूल्यमापन करण्यासाठी योग्य साधने आणि तंत्रे विकसित करणे

20) भाषा समृद्धी करिता अवांतर वाचन करण्यासाठी प्रवृत्त करणे त्यासाठी आवश्यक साहित्य संधी उपलब्ध करून देणे. वाचनकट्टा, बालग्रंथालाय, तरंग वाचनालय तथा वृत्तपत्रकट ऑऊटस यांचा प्रभावी वापर करणे.

## • कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक )

सदर नवोपक्रम अंतर्गत शिक्षण चालू ठेवण्याचा व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्याचा शैक्षणिक पाया मजबूत करण्याचा शिवाय प्रारंभिक अवस्थेत शिक्षणाची गोडी निर्माण करून भाषिक क्षमता व अंकगणित साक्षरता वृद्धी याकरिता यथोचित प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी आजअखेर केलेले प्रयत्न, कार्यक्रम व  महत्वपूर्ण टप्पे खालीलप्रमाणे.....

| अ. क्र. | कालावधी | उपक्रम अंतर्गत कृती |
|---|---|---|
| १ ) | **१ जून , २०२१ ते १४ जून  २०२१** | विद्यार्थी समस्या आढावा घेणे, पालक व तज्ञांशी चर्चा करणे, उपक्रमाचे नियोजन करणे, वरिष्टांचे मार्गदर्शन घेणे, आवश्यक साधन व साहित्याचा विचार करणे. |
| २ ) | **१५ जून २०२१** | विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजन करून 'प्रवेशोत्सव' साजरा करणे. 'पहिले पाऊल', 'विद्यार्थी मिरवणूक' तथा शैक्षणिक साहित्य वाटप आदी. कार्यक्रम घेणे. |
| ३ ) | **१६ जून २०२१ ते २० जून २०२१** | 'माझी ओळख' या कार्यक्रम अंतर्गत विदयार्थ्यांना स्वतःविषयी, स्वतःच्या कुटुंबाविषयी याचबरोबर आवडी-निवडी विषयी बोलण्यास प्रवृत्त करणे. अभिव्यक्ती साठी विविध संधी निर्माण करणे. |
| ४ ) | **२१ जून २०२१ ते ३० जून  २०२१** | लेखन पूर्व तयारीपर कृती कार्यक्रम घेणे. समूह अध्ययन केंद अथवा घरी असताना विविध कृती घेणे, उदा. शेंगा सोलणे, दोरा ओवणे, लसूण सोलणे, रंगानुसार व आकारानुसार गट तयार करणे आदी. |
| ५ ) | **१ जुलै २०२१ ते १० जुलै  २०२१** | अंकज्ञान कृती कार्यक्रम धूळ पाटी वापर करणे. वस्तू, चिंचोके, बिया व अंक कार्ड  यासारखी साधने वापरून गणितीय संबोध दृढ करणे आणि दृढीकरण यासाठी आवश्यक कार्यकम घेणे. |
| ६ ) | **११ जुलै  २०२१ ते २० जुलै २०२१** | स्वनिर्मित इ-साहित्य, YouTube channel व ब्लॉग द्वारे नवोपक्रम बाबत जागृती आणि माहिती प्रसारित करणे तयारी घेणे, अक्षर कार्ड, शब्द कार्ड आदि. गोष्टींचा वापर करून रंजक अध्ययनाची अनुभूती देणे, |
| ७) | **२१ जुलै २०२१ ते ३१ जुलै २०२१** | गणितीय भाषा घेण्यासाठी पूरक उपक्रम घेणे. ध्वनी भाषा, वस्तूंची भाषा, बोटांची भाषा, स्पर्श भाषा, गोष्ट भाषा आदी वर आधारित कृती उपक्रम घेणे गणित पेटीतील साधनांचा वापर करणे. |
| ८) | **१ ऑगस्ट २०२१ ते १५ ऑगस्ट  २०२१** | शब्दतारका डिजिटल बुक, QR कोडयुक्त साधने वाक्यपट्ट्या आदी. साधने बनवणे. शब्द निर्मिती तसेच वाक्यनिर्मिती यासाठी विद्यार्थी उपक्रम घेणे. |
| ९) | **१६ ऑगस्ट २०२१ ते ३१ ऑगस्ट  २०२१** | वर्गात अध्ययन सुलभ आणि पोषक वातावरण तयार करणे यासाठी स्मरत बोर्ड, स्मार्ट टी. व्ही. अलेक्सा डिव्हाईस, बाल ग्रंथालय तरंग वाचनालय यासारख्या सुविधा लोकसहभाग यामधून पूर्णत्वास नेणे. |
| ९) | **१ सप्टेंबर २०२१ ते १५ सप्टेंबर २०२१** | परिसरातील विविध वस्तूंचा वापर करून एक अंकी बेरीज वजाबाकी यासाठी पूरक कृती कार्यक्रम घेणे, गणितीय खेळ घेऊन संबोध व गणितीय साक्षरता दृढ करणे. |
| १० | **१६  सप्टेंबर  २०२१ ते ३० सप्टेंबर २०२१** | वाचन समृद्धी उपक्रमकरिता विविध कार्यक्रम घेणे, वाढदिवस निमित्त शैक्षणिक साहित्य भेट, वृत्तपत्र चा वापर, स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य वापर, स्मार्ट बोर्ड चा वापर, आदी कार्यकम. |
| ११ | **१ ऑक्टोंबर  ते २५ ऑक्टोंबर २०२१** | परिसरात वाचन कट्टा निर्मिती, स्वाध्याय उपक्रम, दशक संबोध करिता विविध कृती कार्यक्रम, इंग्रजी पायाभूत तयारी करिता ऑनलाईन टूल्स चा प्रभावी वापर मूल्यमापन साधने व तंत्रे यांचा वापर करून नोंदी करणे. |

## • उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

ज्या प्रमाणे उपक्रम पूर्वस्थितीचे विद्यार्थी निरीक्षण व नोंदी ठेवल्या त्याचप्रमाणे उपक्रामोत्तर स्थितीचे निरीक्षण व नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रममुळे कोणता सकारात्मक बदल झाला ? विद्यार्थी क्षमतेत कोणते बदल दिसून आले ? कोणकोणत्या पायाभूत भाषिक क्षमता व गणितीय संबोध दृढ झाल्या ? याशिवाय अपेक्षित अध्ययन निष्पती साध्य करु शकलो का ? याचे अवलोकन केले. याबरोबरच कोणत्या उणीवा राहिल्या याचेही आत्मचिंतन केले. शाळा बंद असतानाही मुले अध्ययन प्रवाहात रममान झालीत. शिकण्याची गोडी वाढली. एक प्रकारे शिक्षणाचा पाया मजबूत होत असल्याचे लक्षात आले. विद्यार्थ्यांनी किमान अध्ययन क्षमतावर प्रभुत्व संपादन केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत आत्मविश्वास, सभाधीटपणा, सहकार्य आदी. व्यक्तीमत्व गुणांची अधिक जोपासना झाल्याचे निदर्शनात आले. मराठी व गणित या पायाभूत विषयांची तयारी चांगली झाल्याचे लक्ष्यात आले. पूरक साहित्याचा अध्ययनासाठी योग्य वापर करण्याचे कौशल्य मुलांनी अधिक आत्मसात केले. शिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावीपणे करण्याचही कौशल्य, आवड विद्यार्थी व पालक यांच्यात वाढली. QR कोड चा वापर सहजतेने व सुलभतेने करण्यात विद्यार्थ्यांनी प्राविण्य संपादन केले. शाळा बंद काळात शिक्षण चालू राहण्यास मोठी मदत मिळाली. या सर्व गोष्टी या उपक्रमाचे फलित असल्याचे उपक्रमोत्तर निरीक्षणातून लक्षात आले. मुलांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून लेखनपूर्व तयारी व सराव पद्धती वापरल्यामुळे मुलांचे हस्ताक्षर सुंदर व वळणदार बनले. वाचन करण्याची क्षमता योग्य गतीत असल्याचे लक्षात आले. गणिती संबोध याशिवाय विचारप्रक्रियेला चालना देणारा व निर्भीडपणा निर्माण करण्यास पूरक ठरणारा हा उपक्रम ठरला असल्याचे उपक्रमोत्तर स्थितीत लक्षात आले. **उपक्रमामुळे मुलांच्यात झालेले गुणात्मक व वर्णणात्मक बदल नोंद करण्यासाठी निरीक्षण तंत्राअंतर्गत विविध कसोट्या व परीक्षण तक्ते नियोजनकाळातच बनवण्यात आले होते. त्यामुळे उपक्रमोत्तर स्थितीचे सुयोग्य मूल्यमापन करणे सोपे झाले.**

## • उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :

नवोपक्रम अहवाल लेखन करताना कोणते पुरावे सोबत जोडावे लागतील याचा पूर्वविचार करुन प्रत्येक टप्प्यावर त्याची जपणूक व संग्रह करुन अहवाल लेखनासोबत जोडण्यात आलेत. नवोपक्रमाची माहिती प्रभावीपणे मांडता आली.

i. नवोपक्रम संबधित महत्वाचे फोटो.
ii. नवोपक्रमाची संपूर्ण माहिती प्रात्यक्षिक स्वरुपात दाखवणाऱ्या व्हिडिओंची लिंक.
iii. नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी तयार केलेल्या पूरक ई-साहित्याची लिंक.
iv. संदर्भ म्हणून वापरलेल्या साहित्याची यादी.
v. कृती कार्यक्रम यासाठी तयार केलेले वेळापत्रक व साप्ताहिक नियोजन यांचे नमुने
vi. पूर्व चाचणी, उत्तर चाचणी याकरिता वर्तन बदल नोंद तक्ते व कसोटी नमुने.
vii. विद्यार्थी मूल्यमापन विश्लेषणात्मक तक्ते, आलेख.
viii. उपक्रम जागृती व मार्गदर्शन यासाठी सुरु करण्यात करण्यात आलेल्या विशेष संवाद मालिकेतील व्हिडिओ लिंक.
ix. उपक्रमातील सहभागी घटकांच्या प्रतिक्रिया, अभिप्राय.
x. इ-साहीत्य, स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य यांचे नमुने, आवश्यक इतर साहित्याची यादी व उपक्रम अंतर्गत वापरलेल्या व वाटप केलेल्या पूरक शैक्षणिक साहित्याची यादी .
xi. नवोपक्रम अंतर्गत घेतलेल्या महत्वाच्या उपक्रमांची/ कृती कार्यक्रमांची यादी.

# ❑ ५. उपक्रमाची कार्यपद्धती






## ▪ उपक्रमाची निश्चिती व कार्यवाहीचे नियोजन :-

**इयत्ता १ ली ची कक्षा ही शिक्षणव्यवस्थेतील सर्वात महत्वपूर्ण प्रारंभिक टप्पा आहे. या प्राथमिक आणि पायाभूत अवस्थेत सुयोग्य प्रकारे भाषिक क्षमता आणि गणितीय साक्षरता अवगत होणे आवश्यक असते. विद्यार्थी केंद्रित कृतीशील अध्ययन अनुभवातूनच विद्यार्थ्यांचा खऱ्या संबोध होत असतो.** सध्याच्या काळात ऑनलाईन शिक्षण पद्धती या वयोगटासाठी मर्यादा असणारी व आरोग्यावर परिमाण करू शकणारी वाटल्याने वेगळ्या कृतीशील आनंददायी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. मुक्त आणि लवचिकता असणाऱ्या भयमुक्त वातावरणात मुलांना योग्य दिशा देणारा कार्यक्रम आखण्यात आला. मराठी, गणित व इंगजी या विषयांची पायाभूत क्षमता व अध्ययन निष्पती साध्य होईल यासाठी आवश्यक उपक्रमांची यादी करून त्याचे क्रमवार कालबद्ध नियोजन करण्यात आले.

सदर उपक्रमाकरिता शिक्षका इतकीच पालकाची भूमिका महत्वाची होती. यासाठी इयत्ता १ ली साठी दाखलपात्र असणाऱ्या सर्व १३ विद्यार्थ्यांच्या पालकांना संपर्क करून सदर वर्गासाठी प्रथम सत्र पासून एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करत असल्याची कल्पना दिली. त्या अनुषंगाने पालकांची भूमिका, यात येणारे अडथळे व त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली. या नवोपक्रमातून मुलांच्या या पायाभूत कक्षेत पायाभूत क्षमता विकसित करण्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने यास ' पक्का पाया पहिलीचा... जाणीव पहिला आकार देताना' असे नाव देण्यात आले. अर्थात या उपक्रमातून इयत्ता १ ली चा विद्यार्थी घडवत असताना एक शिक्षक म्हणून आणि एक पालक म्हणून आपणास कोणती जाणीव असावी ? कोणती भूमिका असावी याचे स्वानुभवातून उत्तरच मिळणार होते. प्रचलित शिक्षण पद्धती पेक्षा वेगळ्या पद्धतीचा आणि कृती कार्यक्रमांचा अंतर्भाव करत सदर नाविन्यपूर्ण आणि आनंदपूर्ण उपक्रमाची निश्चिती करण्यात आली. या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन जून मध्ये शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी करण्यात आले आणि या उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही शाळेच्या प्रथम दिनापासून सुरु झाली.

## ▪ प्रवेशोत्सवदिनी 'पहिले पाऊल' हा विशेष कार्यक्रम साजरा :-



कोणतेही मूल ज्यावेळी शाळेत प्रवेश घेते. नवीन वातावरणात येते त्यावेळी साहजिकच ते एका विशिष्ट दडपणाखाली असल्याचे जाणवते. एक अपरिचित ठिकाणी नवा अध्याय सुरु करत असताना असुरक्षित असल्याची भावना न कळत त्याच्या मनामध्ये सुरु असते. म्हणूनच दरवर्षी आपण प्रवेशोत्सव प्रसंगी अनेक आनंदपूर्ण कार्यक्रम घेणे गरजेचे आहे ज्यातून मुलांना भयमुक्त आणि आनंदपूर्ण वातावरण लाभेल. याच बालमानसशास्त्रीय विचारातून आम्ही या उपक्रमांतर्गत अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले त्यापैकी एक विशेष कार्यक्रम म्हणजे 'माझे पहिले पाऊल'. या मध्ये दाखल झालेल्या सर्व मुलांचे शाळेच्या पहिल्या दिवशी अर्थात १५ जून २०२१ रोजी कोऱ्या कागदावर रंगीत पावलाचे ठसे घेण्यात आले. त्यांची ही शाळेत पहिले पाऊल टाकण्याची आठवण अश्या कार्यक्रमद्वारे जतन करून ठेवण्यात आली. यात मुलांना देखील खूप आनंद वाटला. या शिवाय मुलांना वाजत गाजत मिरवणूक काढत शाळेत आणण्यात आले. पहिल्या दिवशी शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.



**बशाचा मोळा शाळेस सॅनिटायजर स्प्रे मशीन भेट**

वार्ताहर
पाटगाव

पाटगाव : विद्या मंदिर बशाचा मोळायेथे सॅनिटायजर स्प्रे मशीन देताना सभापती सौ. आक्काताई नलवडे व इतर.




मा. सभापती यांचेकडून प्रवेशोत्सवदिनी उपक्रमास सेनीटायजर स्प्रे मशीन भेट



सामाजिक घटक यांचेकडून प्रवेशोत्सवदिनी इयता १ ली मधील मुलांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.

## ▪ उपक्रमासाठी आवश्यक साधनांचा विचार :-

**‘कृतीतून शिक्षण’ तथा ‘खेळातून शिक्षण’** या सूत्रावर सदर उपक्रमाची निश्चिती केली असल्याने यास पूरक आणि आवश्यक अशा सर्व साधनांचा आणि वस्तूंचा सर्वप्रथम विचार करण्यात आला. यातील काही साधने सहज उपलब्ध होणारी होती तर काही साधने बनवावी लागणारी होती. त्याचे वर्गीकरण करून यादी करण्यात आली.




रांगोळीचा वापर करत धूळपाटी



कागदाचा वापर करत बोटांचा व्यायाम



सुईत दोरा ओवणे यातून एकाग्रता

लेखनपूर्व तयारी करिता बोटांचा व्यायाम तथा एकाग्रता काही कृती कार्यक्रम घेण्यात आले. त्यासाठी घरामध्ये सहज उपलब्ध होतील अशा वस्तूंचा वापर करण्यात आला. उदा. रांगोळी, बिया, चिंचोके, कागद, सुई दोरा, बाटली पाणी इत्यादी. बोटांचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करत कागद फाडणे, शेंगा फोडणे, बाटलीत पाणी ओतणे याशिवाय गंगावण वेणी घालणे यासारखे विविध उपक्रम साहित्याचे सह्यायाने घेण्यात आले. परिसरात अगदी सहजपणे उपलब्ध होणाऱ्या वस्तूंचा वापर आपण लेखन पूर्व तयारी करिता अथवा गणितीय साक्षरता निर्माण करण्यास करण्यात आला . या साधनांचा वापर करत कश्या प्रकारे कृती मुलांच्या कडून करून घ्यायची याबाबत विशेष संवाद मालिकेतून पालकांना दाखवण्यात आले. याशिवाय त्या बाबत प्रतिसाद वेळोवेळी नोंद करण्यात आला.

| |
|---|
| कृती उपक्रमाची माहिती व्हिडिओ स्वरुपात पहा :<br>https://youtu.be/dsd70I27nYk |



शेंगा फोडून बोटाचा व्यायाम




लसून सोलून बोटाचा व्यायाम



गंगावण, पीठ याद्वारे बोटाचा व्यायाम



## मूलं समजून घेताना....

प्रत्येक मुलाला समजून घेण्यापूर्वी मुलाला समजून घेण्यासाठी त्याच्या आवडी निवडी, निवडी शिवाय त्याचे भावविश्व समजून घेणे खूप गरजेचे असते. यासाठी पहिल्या **सप्ताहात ‘माझी ओळख’** विशेष अभिव्यक्ती कार्यक्रम घेऊन मुलांना स्वत:विषयी मुक्त बोलण्याची संधी देण्यात आली.

‘माझी ओळख’ हा उपक्रम व्हिडिओ स्वरुपात पहा :
https://youtu.be/lHrlmB-pkLk




## शैक्षणिक साहित्याची परिपूर्ती....

सर्व मुलांना आवश्यक ते सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्ध असावे यासाठी **‘वाढदिवस आमच्या मित्राचा’** हा विशेष कार्यक्रम सुरु करून प्रत्येकाने आपल्या वाढदिवसादिवशी कोणतीही अभ्यासपूरक साहित्य भेट आपल्या मित्रांना देण्याची पद्धत सुरु करण्यात आली. यातून सर्व मुलांना आवश्यक साहित्य प्राप्त झाले

## नवोपक्रम जागृती व माहिती प्रसार करिता विशेष संवाद मालिका

**सदर उपक्रम केवळ माझ्या शाळेत अगर माझ्या मुलांच्यासाठी मर्यादित राहू नये यासाठी ब्लॉग व YouTube Channel द्वारे महितीचा व नवोपक्रमाचा प्रसार करण्यात आला. महत्वपूर्ण विषयावर तसेच आवश्यक प्रात्यक्षिक कृतीवर आधारित मार्गदर्शन करण्यात आले.**









| | |
|---|---|
| संवाद १ | **https://youtu.be/UOih7u_XHLM** |
| संवाद २ | https://youtu.be/dsd70I27nYk |


| | |
|---|---|
| संवाद ३ | **https://youtu.be/loFLJrXcxVc** |
| संवाद ४ | https://youtu.be/dOx3Sd29-8A |

# गणितीय संबोध तथा अंकगणितीय साक्षरता करिता कृती कार्यक्रम












## कृतीतून शिक्षण ... खेळातून शिक्षण

विविध साधनांचा वापर करून ज्ञानरचनावादी पद्धतीचा वापर करत विविध कृती मुलांच्या कडून करून घेण्यात आल्या त्यासाठी आवश्यक त्या सूचना पालकांना देण्यात आल्या. याशिवाय प्रात्यक्षिक नमुने देखील देण्यात आले. **काड्या, अंककार्डे, बिया, मणी, खडे, डाळी,यासारख्या घरातील वस्तूंचा देखील कल्पकतेने वापर करण्यात आला.**

यामधून मुलांच्यात निर्माण झालेल्या गणितीय संबोध, क्षमता आणि कौशल्ये खालीलप्रमाणे...

- १ ते ९ चा संबोध व दृढीकरण
- ० चा संबोध व दृढीकरण
- दशक चा मुलभूत संबोध व दृढीकरण
- संख्याचा क्रम ओळखणे
- संख्यांचा लहानमोठेपणा ओळखणे
- एक अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी
- व्यावहारीक जीवनातील शाब्दिक उदाहरणे सोडवणे.
- सख्येइतक्या वस्तू दाखवणे
- वस्तू अचूकपणे मोजणे
- गणितीय भाषेचा वापर करणे
- अंकाचे अनुलेखन तथा श्रुतलेखन करणे

## विद्यार्थी समवेत घेतलेल्या काही कृती कार्यक्रमांचे प्रात्यक्षिक व्हिडिओ

| | |
|---|---|
| एक अंकी संख्या दृढ़ीकरण कृती उपक्रम | https://youtu.be/ESPgeJqbxWQ |
| गणितीय साक्षरता पूरक खेळ | https://youtu.be/2reyAyGwHQw |
| दशक संबोध कृती क्र 1 | https://youtu.be/IbqST5f_rnc |
| दशक संबोध कृती क्र 2 | https://www.youtube.com/watch?v=l43HOqFFyFQ |

# लेखन तयारी विशेष उपक्रम



Laminated cards चा अनोखा वापर



अक्षरावर क्रमाने डाळ चिकटवताना



लेखन सराव गुंडाळी फलकद्वारे


- ❑ सुरवातीच्या काळात लेखनपूर्व तयारी साठी रेषा, गोल, अर्धगोल यासारखे विशिष्ठ आकार गिरवण्याचा व त्यानंतर अक्षर गिरवण्याचा आपण सराव घेत असतो. यासाठी पुष्कळ प्रिंट्स लागतात पण यावर उपाय म्हणून सदर प्रिंट मी Laminate केल्या व त्यावर मार्कर ने गिरवण्यास सांगितले त्यामुळे त्याचा पुन्हा पुन्हा वापर करणे सहज सुलभ झाले.
- ❑ अक्षरांचा क्रम सहजपणे लक्षात यावा तो दृढ व्हावा याकरिता अक्षरकार्डवर क्रमाने डाळी चिकटवण्याचे काम देण्यात आले.
- ❑ मोठ्या आकारात लेखन केल्यावर अक्षरलेखनातील चुका सहजपणे लक्षात येतात यासाठी गुंडाळी फलक वाटप करून समूह अध्यापन ठिकाणी सराव घेतला गेला.




बशाचामोळा शाळा बनली स्मार्ट स्कूल

तालुक्यातील स्मार्टबोर्डयुक्त पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा







## स्मार्ट बोर्ड व इतर ICT साधनांचा प्रभावी वापर

- ❑ या आपत्ती काळात अध्यनात निरसता येऊ नये. अध्ययन प्रभावी व्हावे. याकरिता ICT साधनाचा वापर करण्यात आला. लोकसहभागातून स्मार्ट बोर्ड ची व्यवस्था करण्यात आली. अशी सुविधा असणारी ही तालुक्यातील पहिलीच शाळा बनली. शाळा बंद असल्याने प्रत्येक मुलाला संधी मिळेल असे नियोजन करून वेळापत्रक बनवण्यात आले. सुरक्षितता पाळून प्रत्येक मुलास स्मार्ट बोर्ड हाताळण्यास संधी देण्यात आली
- ❑ या इंटरएक्टीव बोर्ड वापरामुळे मुलांना भाषिक कौशल्ये शिवाय गणिती कोशल्ये सहजपणे आणि आनंदपूर्ण वातावरणात आत्मसात झालीत.
- ❑ मोठ्या आकारात अक्षरवाचन, संख्यावरील क्रिया व उदाहरणे मुलांना सोडवणे खूप रंजक अनुभव ठरला
- ❑ याशिवाय भाषण संभाषण विकासाकरिता अलेक्सा डिव्हाईसचा देखील प्रभावी वापर करण्यात आला.

**स्मार्ट बोर्ड द्वारे वाचन लेखन गणित सराव**

https://youtu.be/jPti50QbcfE

# भाषा समृद्धी करिता विशेष उपक्रम

भाषा विकास करिता वाचनाची अधिकाधिक संधी मिळावी वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी नवोपक्रम अंतर्गत विविध वाचन प्रकल्प निर्माण करण्यात आलेत त्याची थोड्क्यात माहिती......



## वाचन कट्टा निर्मिती :

शाळा बंद असताना मुलांना वाचनाची संधी सहज सुलभ आणि आकर्षकपणे उपलब्ध व्हावी यासाठी एक वेगळा उपक्रम उभारला गेला तो म्हणजे 'वाचन कट्टा' शाळा परिसरात अथवा मुलांच्या घराच्या परिसरात मोठ्या कागदी पुठ्ठ्यावर अथवा मोठ्या भिंतीवर शब्दकार्ड प्रिंट्स चिकटवून मुलांना वाचनासाठी एक वेगळी संधी उपलब्ध करून दिली. मुलांना हे हाताळणे खूप सोपे होते.

'वाचन कट्टा ' हा उपक्रम व्हिडिओ स्वरुपात पहा :
https://youtu.be/X1bi4Liv7sQ



## रचनावादी अक्षरकार्डे व शब्द्कार्डे निर्मिती :

पायाभूत भाषिक क्षमता व शब्दसंपत्ती याकरिता मुलांनी ज्ञानरचनावाद पद्धतीने शब्दनिर्मिती करावी या उद्देशाने वैशिष्टपूर्ण अशी विविध अक्षरकार्डे तथा वाक्यपट्ट्या बनवण्यात आल्या. सुरवातीला अगर शेवटी असणाऱ्या अक्षराला जोडून सहजपणे शब्द निर्मिती मुले करु शकलीत. ज्यामुळे मुलांनी स्वत:हून शब्द निर्मिती केली.

'रचनावादी अक्षर कार्ड' हा उपक्रम व्हिडिओ स्वरुपात पहा :
https://youtu.be/sel64a9Z8ZU

QR CODED DIGITAL BOOK



## शब्द्तारका डीजीटल प्रोजेक्टची निर्मिती व वापर :

मराठी वाचन लेखन करिता उपयुक्त ठरेल असा 'शब्द्तारका संच' हा डीजीटल प्रोजेक्ट तयार केला, याच्या PDF, VIDEO तसेच FLIPBOOK आवृत्ती देखील तयार केली. सर्वात विशेष ठरले ते या प्रोजेक्ट चे डिजिटल बुक QR कोड सुविधासह बनवलेले हे बुक हाताळण्यास खूप लाभदायक ठरले. शिवाय याचा वापर राज्यभरातील अनेक शाळांनी देखील उपयुक्त शैक्षणिक साहित्य म्हणून केला.



MAGAZINE RACK व तरंग वाचनालय उभारणी

| | |
|---|---|
| मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई-साहित्य ( पीडीएफ व फ्लिपबुक आवृत्ती ) | https://desaisachin.blogspot.com/2020/10/my-digital-book.html |
| नवोपक्रम यशस्वीतेसाठी पूरक ई-साहित्य म्हणून तयार केल्याल्या QR कोडयुक्त डिजीटल बुकचा वापर विद्यार्थ्यांनी स्वघरी कसा केला ? याचे प्रात्यक्षिक (video) | https://youtu.be/3p4UD6mXfsI |

## • पक्का पाया पाहिलीचा या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी

**( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )**

| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| Nivedita chandrakant Madiwal | Marathi Vidyamandir Rajapur | 9404421588 |
| श्री.नवनाथ विष्णु सांगळे | z.p.semi English school maneganv | 9921007089 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | 8007917177 |
| Sandhyarani pradip yevale | Z.p.school ,ghanvatmala (Bagani) | 7588627020 |
| Pravina maitre | Z P.Upper.Pri..School Kolona chore | 9552129895 |
| वाघडोळे राजकुमार बालाजी | जि प प्रा शा राजेगाव | 9405820963 |
| SAYYAD ASMA | Z.p.p.s Mahadevnagar | 9766478378 |
| CHANDMUBARAK | Z.P.P.S.Ghansargaon | 9404682138 |
| Chavan Arun Nagnath | ZPPS राजपिंपरी | 9623483048 |
| वांगीकर अंजली माणिकराव | Z.p.school Khirpuri Khurd | 9011559066 |
| Manohar Akhare | Z.P.School Vinchur | 9011785157 |
| Vaishali Ganpat Sonawane | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनवडेवाडी | 9890449115 |
| कांचन शिवाजी सनगर | Vidya Mandir Mahadikwadi | 8788420147 |
| Archana Pramod Korane | V.M.Akurde | 9921186604 |
| Ashwini Ravindra Bhalekar | Vidya Mandir Donvade | 9404990640 |
| Ashwini Rajendra Shinde | Z P Upper pri.School Pipri | 9763084635 |
| Marathi Ramdas Ratbod | Z. P. Primary school Bopapur (dighi) | 9970614973 |
| Ku. Meenakshi Girdharrao Ganvir | Kanya vidya mandir vasagade | 8788225655 |
| Shendage Sandip Krishna | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. परतूर | 9423246143 |
| पठाण एन. जी. | Z.p.upper primary school chanki | 9923936116 |
| Anupama bhujangrao petkar | Vidya mandir kondigre .Tal shirol | 8379909499 |
| Ganesh Namdev kare | Z.pp school Kaudgav | 9403935966 |
| Sujata Ravindra Borude | जिल्हा परिषद शाळा नंबर २ आकिवाट | ८७७९०७०६९१ |
| राजश्री सुधाकर माने | Z.P.H.S. SAHAPUR TQ. DEGLOOR | 9421767520 |
| JAIPRAKASH MADHAVRAO | Kumar v. M. Dattwad | 9822762272 |
| INGLE | विद्या मंदिर अनफवाडी जि. कोल्हापूर | 7709232492 |
| Kallappa sidram pujari | लंगडी | 7875293476 |
| कृष्णा अशोक शिलवंत | जि प शाळा हनुमंतवाडी (सोमंथळी )तालुका - | 9881412421 |
| ज्योती संतोष उतेकर | फलटण | 9420948648 |
| सुनिता श्रीधर ढालपे | पिंपळगाव माळवी | 9404395080 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | ZPPS Shirgaon Kondoshi | 9370027601 |
| Jayendra Ganpat Chavan | Z.P.P.SCHOOL | 9860660524 |
| Pallavi Pravas Gatkal | NARODEVASTI(PATHRE BU) | 9881022057 |
| संभाजी बाबूराव खामकर | कन्या वि.मं. मुरगूड. ता.कागल.. | 7385300742 |
| दमयंती शिवाजी ठोके | जिल्हा परिषद शाळा आग्रीपाडा | 9922665846 |
| विवेक पुरूषोत्तम पाटील | जि प उच्च प्रा शाळा जाजनुर ता निलंगा | 7843081146 |

- **पक्का पाया पाहिलीचा या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी**


**( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )**

| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| मनिषा मनोहर गामणे | Z.P.P.SCHOOL NARODEVASTI(PATHRE BU) | 8286979980 |
| Pallavi Pravas Gatkal | चाफवली नं.१ | 9370027601 |
| ज्ञानदेव विठ्ठल भोसले | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओंडोशी | 9763138142 |
| संजय बाबुराव नांगरे | Vidya Mandir Vikaswadi Savarde Bull | 9923174411 |
| Sandip Shivaji Mahekar | पिंपळगाव माळवी | 9923776907 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | Sant tukaramnagar | 9420948648 |
| Gaikwad Dilip Ganpat | Z P Pri School Vanasgaon Tal Niphad Dist Nashik | 9730574872 |
| Samadhan Namdev Pawar | कन्या वि.मं. मुरगूड. ता.कागल.. | 9922189974 |
| संभाजी बाबूराव खामकर | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. परतूर | 9860660524 |
| पठाण एन. जी. | कुमार विद्या मंदिर तेरवाड | 9423246143 |
| धनश्री शितल यलगुडे | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | 7741006679 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | विद्या मंदिर बेलवळे बु।। ता.कागल जि. कोल्हापूर | 8007917177 |
| श्री.अंकुश सदाशिव माने | जि. प.प्रा. शाळा नानेगाव | 8975966624 |
| अश्विनसिंग अंगदसिंग राजपूत | जि.प.के.प्रा.शा.पानकनेरगाव | 9850513258 |
| नरवाडे बाजीराव विश्वनाथ | St.peter church marathi pratmik shala Arnala | ९४२२९३८१५५ |
| Joyce Florian Dsouza | श्री महालक्ष्मी वि.मं.कोकिसरे | 9028242338 |
| श्री .प्रदीप विठ्ठल नाळे | ZPP SCHOOL NANDURVIHIRE | 9404114869 |
| Altab Bashir Bagwan | dr APJ ABDUL KALAM N P URDU SCHOOL NO 57 | 9594983611 |
| HIDAYAT MULLA | ICHALKARANJI | 7385300742 |
| जयप्रकाश हरिदास कांबळे | ZPPS नरसिंहपूर | 9850586060 |
| सौ अलका रमेश ढवळे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किरपे. तालुका कराड | 9764669444 |
| Manoj Shivajirao Kamble | Z P P School Hajjapur | 9665438005 |
| Shendage Sandip Krishna | Kanya vidya mandir vasagade | 8788225655 |
| Sarjerao Dhulappa Patil | Kumar v m kacbha Thane | 9158337834 |
| रमेश महाडीक | जि प शाळा मालदन | 7798727330 |
| Manisha Laxman Nerkar | Z.P . School Somthandesh | 9011289522 |
| JAIPRAKASH MADHAVRAO INGLE | Z.P.H.S. SAHAPUR TQ. DEGLOOR | 9421767520 |
| ज्योती भिमाशंकर चौंडे | जि प प्रा शाळा गोजेगाव ता औंढा | 9096505176 |
| Ranjana Mallikarjun Hasure | V.M.Laxminagar Bhadgaon | 9623699583 |
| सौ . कविता विनायक चौगले | विद्या मंदिर सोनाळी | 9421366138 |
| अजित प्रभाकर संगवे | जि. प.शाळा घोडापाडा | 9665934991 |
| सुनिता श्रीधर ढालपे | जिल्हा परिषद शाळा हनुमंतवाडी (सोमंथळी )तालुका - फलटण | 9881412421 |
| RAJU MAHADEV NANNORE | Z P SCHOOL SASTI | 8007876674 |
| संजय बाबूराव चोथे | विद्या मंदिर जी.के.नगर तारदाळ | 9021418318 |
| Lahu Arjun Pimple | Z.P.Primary School Mirjewadi | 7588561176 |
| Kshetre Sarita | Z. P. P. S., Gulabharivasti | 8055652784 |
| Shrimati Garje Sandhya Ganpatrao | Z P P S Desur | 7588327191 |
| | ZPPS Shirgaon Kondoshi | 9921186604 |




घरपोहोच स्वाध्यायपुस्तिका वाटप






विद्यार्थी व पालक ऑनलाइन संवाद



शेवग्याची शेती प्रकल्प



रोपदान व संगोपन जबाबदारी

## ▪ स्वखर्चातून स्वाध्याय पुस्तिका वाटप :-

या आपत्ती काळात विद्यार्थ्यांना आधिकाधिक सरावाची संधी मिळणे: शिवाय विद्यार्थ्यांना अधिकाधिक अध्ययन प्रक्रियेत क्रियात्मक ठेवणे या शाळा बंद काळात आवश्यक होते. या विचारासोबत अध्ययन दृढीकरण व मूल्यमापन यासाठी प्रत्येक मुलांना स्वाध्याय पुस्तिका देणे आवश्यक होते. बहुतांश पालक सर्वसामान्य शेतकरी असल्याने सर्वांना अशी स्वाध्यायपुस्तिका विकत घेणे शक्य नव्हते. याचा विचार करून, परिस्थितीची वास्तवता लक्षात घेवून स्वतः विद्यार्थांना स्वखर्चातून स्वाध्याय पुस्तिका घरपोच वाटप केल्या. सदर पुस्तिका अभ्यासवर्ग कालावधीत लिटल टीचर च्या सहकार्याने सर्वांच्याकडून सोडवून घेण्यात आल्या. आवश्यक तिथे मार्गदर्शन करण्याबाबतच्या सूचना दिल्या गेल्या. मुलांचा अध्ययन स्तरही यामुळे लक्षात आला. उपचारात्मक नियोजन त्यानुसार केले.

## ▪ विद्यार्थी व पालकांशी ऑनलाइन सुसंवाद :-

पालक या नवोपक्रमात एक दुवा, एक समन्वयक म्हणून काम करत होता. त्याच्याशी सातत्याने त्याच्याशी संपर्कात रहाणे, नियमित सुसंवाद राखणे अत्यावश्यक होते. प्रत्यक्ष भेट वारंवार घेणे या काळात शक्य नसलेने ऑनलाइन माध्यमांचा वापर सुरु केला. गुगल मीट व झूम ॲप द्वारे अनेकवेळा वेबिनार आयोजन केले. पालकांना आवश्यक त्या सूचनाही देण्यात आला. जाणवणाऱ्या अडचणीवर यामुळे तोडगा काढणे शक्य झाले.

## ▪ कला, कार्यानुभव व शा.शिक्षण अंतर्गत उपक्रम :-

भाषा, गणित या विषयासोबत इतर विषयांचा समतोल साधता येणे, अनुभूतीची जोड देणे आवश्यक होते. या समतोल विचारातून सहज शक्य कृतीउपक्रम या नवोपक्रम अंतर्गत घेण्याचे नियोजन करण्यात आले. ज्यामुळे कला, कार्या. शा.शिक्षण यासारख्या विषयांनाही खऱ्या अर्थाने या शाळा बंद काळात न्याय देता आला. या कालावधीत मुलांच्या कोरोना विषयावर चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, शालेय आवार सफाई यासारखे कार्यक्रम घेतले. या वर्षी सामुहिक वृक्षलागवड करता आली नसली तरी काही विशेष कार्यानुभव कार्यक्रम या नवोपक्रमअंतर्गत घेण्यात आले. उदा. **‘शेवग्याची शेती’ हा विशेष प्रकल्प राबवला** ज्यामध्ये बीजारोपण पासून लागवड पर्यंत सर्व प्रक्रिया मुलांनी केल्या. **‘वृक्ष आपला मित्र आला आपुल्या दारी’ या अभियान** अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप कुडीसह देण्यात आले. व त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी देण्यात आली, या सर्व गोष्टीचे निरीक्षण व सर्वेक्षण करण्याची जबाबदारी सर्व लिटल टीचर ने या काळात प्रभावीपणे पार पाडली.

## ▪ माहितीचे विश्लेषण व आलेख तक्ते :-


या नवोपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची आंतरक्रिया योग्य प्रकारे साधली गेली. मुक्त, आनंदपूर्ण व सुरक्षित वातावरणात मुलांनी शिक्षणाची अनुभूती घेतली यातून आपेक्षित उद्दिष्ट साध्य झाले. आवश्यक गुणात्मक पातळीत वाढ झाली. किमान संपादणूक व क्षमता साध्य करण्यात यश प्राप्त झाले. नवोपक्रम च्या सुरवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली होती. यात विद्यार्थी क्षमता, कौशल्य आणि वर्तन यांचे निरीक्षण करून योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रमअंती अशीच समांतर निरीक्षणात्मक उत्तर चाचणी घेतली. मुलांच्यातील समाधानकारक बदल व प्रगती व त्याचा आलेख दृष्टीक्षेपात आला.

या शिवाय आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे विद्यर्थ्यांच्यामध्ये अपेक्षित पायाभूत क्षमता, अध्ययन निष्पती, साध्य करण्यात यश प्राप्त झाले.

### विद्यार्थ्यांच्या पूर्वचाचणी व उत्तर चाचणी मध्ये झालेली गुणात्मक वाढ

एकूण पटसंख्या 13 | निरीक्षण केलेली विद्यार्थी संख्या 13

| अ. क्र. | निरीक्षण केलेली क्षमता, कौशल्य / अध्ययन निष्पती | पूर्वचाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१३ पैकी ) | उत्तर चाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१३ पैकी ) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ ) | आत्मविश्वास पूर्वक स्वतःबद्दल माहिती सांगणारे | २ | १२ | ७६.९ % |
| २ ) | सर्व मुळाक्षरे ओळखणारे | २ | १३ | ८४.६ ०% |
| ३ ) | सर्व मुळाक्षरे यांचे श्रुतलेखन करणारे | १ | १३ | ९२.३ % |
| ४ ) | १ ते १० अंकवाचन करणारे | १ | १३ | ९२.३ % |
| ५ ) | संख्येइतक्या अचूक वस्तू दाखवणारे | २ | १३ | ८४.६१ % |
| ६ ) | शब्दातील समान अक्षर शोधणारे | ३ | १३ | ७६.९२ % |
| ७ ) | ध्वनी भाषा अचूक ओळखणारे | २ | १२ | ७६.९२ |
| ८ ) | स्पर्श भाषा अचूक ओळखणारे | १ | १३ | ९२.३० % |
| ९ ) | वस्तूचा आकारनुसार वर्गीकरण करणारे (लहान – मोठेपनानुसार ) | ४ | १३ | ६९.२३ % |
| १० ) | दैनदिन जीवनातील ९ पर्यंत संख्याची बेरीज वजाबाकी करणारे | २ | १३ | ८४.६१ % |
| ११ ) | दिलेल्या अक्षरापासून शब्द तयार करणारे | १ | १३ | ९२.३० % |
| १२ ) | इंग्रजी अल्फाबेट योग्य प्रकारे अनुलेखन करणारे | ३ | १३ | ७६.९२ % |
| १३ ) | स्वतःहून शंका अथवा प्रश्न विचारणारे ( २३) | ४ | १३ | ६९.२३ % |




**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली तंत्रे</u>**

- मुलाखत
- निरीक्षण

**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली साधने</u>**

- प्रश्नावली
- पडताळा सूची
- पदनिश्चयन श्रेणी

## इयत्ता १ ली नवोपक्रम अंतिम स्थिती
## ( मूल्यमापन तंत्र- परिपूर्ण क्षमता/ कौशल्य प्राप्त = √   क्षमता/ कौशल्य अप्राप्त = X )

| अ.क्र. | विद्यार्थी नाव | वाचन कौशल्य (जोडाक्षर विरहीत शब्द ) | लेखन कौशल्य (सोपे शब्द ) | संख्याज्ञान (१ ते १० ) |
|---|---|---|---|---|
| १ | पाटील साईराज सुनिल | √ | √ | √ |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | √ | √ | √ |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | √ | √ | √ |
| ४ | वांजोळे विराज विजय | √ | √ | √ |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | √ | √ | √ |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | √ | √ | √ |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | √ | √ | √ |
| ८ | संकपाळ शुभम बबन | √ | X | √ |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | √ | √ | √ |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | √ | √ | √ |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | √ | √ | √ |
| १२ | संकपाळ शिवन्या शिवाजी | √ | √ | √ |
| १३ | वांजोळे अथर्व दीपक | √ | √ | √ |

# • यशस्विता :

## या उपक्रमामुळे मुलांच्यात घडून आलेले सकारात्मक बदल :-

या नवोपक्रममुळे माझी सर्व मुले खऱ्या अर्थाने प्रगत बनली त्याच्यात झालेले गुणात्मक आणि भावात्मक बदल खालील प्रमाणे....

१ ) सर्व मुले मुळाक्षरे सहजपणे ओळखतात
२ ) सोपे मराठी शब्द आणि वाक्ये यांचे वाचन करतात.
३ ) अक्षरापासून सहजपणे शब्द बनवतात.
४ ) स्वतः विषयी आणि कुटुंबाविषयी आत्मविश्वासाने माहिती सांगतात.
५ ) सुवाच्छ आणि वळणदार आकारात अनुलेखन व श्रुतलेखन करतात.
६ ) चित्राचे निरीक्षण करून त्यावर प्रश्न विचारतात.
७ ) चित्राची आपल्या शब्दात माहिती सांगतात.
८ ) स्मार्ट बोर्ड चा प्रभावीपणे वापर करतात
९ ) १ ते ५० पर्यंतचे संख्याज्ञान झाले.
१० ) वस्तूचा वापर करून दशक बनवतात.
११ ) व्यावहारिक जीवनावर आधारित एक अंकी बेरीज वजाबाकी प्रश्न तोंडी सोडवतात.
१२ ) इंग्रजी भाषा बद्दल गोडी निर्माण झाली.
१३ ) कृती युक्त अध्ययन करण्याची क्षमता प्राप्त झाली.
१४ ) श्रावण, भाषण, वाचन व लेखन या सर्व क्षमतांचा विकास झाला.
१५ ) गणितीय साक्षरता मुलांच्यात निर्माण झाली.
१६ ) स्वतःच्या आरोग्याविषयी काळजी घेण्याची सवय वाढली.
१७ ) एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढली.
१८ ) कल्पकतेला व विचारक्षमता यांना चालना मिळाली.
१९ ) मुलांना अवांतर वाचनाची गोडी वाढली
२० ) मुलांना तंत्रज्ञानाची गोडी वाढली.

## • कार्यवाहीत आलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना :

नवोपक्रम राबवत असताना काही समस्या आणि अडचणी आल्या पण त्यांचा सारासार विचार करुन प्रसंगी अनुभवी, तज्ञांचे तसेच वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवून समस्या सोडवण्यात आल्या. योग्य पर्यायांचा विचार करण्यात आला.

1 ) इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी मर्यादित स्वरुपात ऑनलाईन पद्धती वापरून कृतीशील कार्यक्रम व उपक्रम घेणे अत्यावश्यक होते. हे घेण्यासाठी प्रत्यक्ष शाळा सुरु होणे आवश्यक होते,पण कोरोना कारणाने शाळा सुरु होण्यास परवानगी मिळाली नाही.

- मुलांना नियमित शाळा पद्धतीने बोलवण्यास मर्यादा आल्याने शाळा परिसरात अथवा मुलांच्या परिसरात समूह अध्यापन केंद्रे निर्माण करून शिक्षण अखंडीत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

2 ) पायाभूत भाषिक क्षमता तसेच अंकगणितीय साक्षरता यासाठी मुलांच्याकडून विविध कृती उपक्रम तसेच ज्ञानरचानावादी प्रात्यक्षिके करून घ्यायची होती हे सर्व पालकांनी घरी मुलांच्याकडून करून घ्यायचे होते. सर्व तोंडी समजावून सांगणे अशक्य होते.

- या काळात प्रत्यक्ष भेट शक्य नसल्याने या नावोक्रमकरिता पालकांच्यासाठी विशेष संवाद व्हिडिओ मालिका स्वनिर्मित यु ट्यूब चनेल वर सुरु करण्यात आली. त्याद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. ZOOM APP तसेच GOOGLE MEET यासारख्या माध्यमांचा वापर केला तसेच ऑनलाईन व्हिडिओद्वारे देखील संपर्क साधला. ज्यांच्याशी ऑनलाईन संपर्क करता येत नाही त्यांना प्रत्यक्ष संपर्क करुन योग्य त्या सूचना दिल्या. ज्यांचेकडे उपलब्ध होता त्यांनी अभ्यासवर्गात इतरांना लाभ दिला. समूह अध्ययन शक्य झाले.

3 ) या काळात प्रत्येक विद्यार्थ्याने व्यक्तिगत स्वच्छता अतिशय काटेकोरपणे पाळणे आवश्यक होते. यात निष्काळजीपणा अगर दुर्लक्ष आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक होते.

- प्रत्येक अभ्यासकेंद्रावर सेनीटायझर उपलब्ध करुन देण्यात आले. या शिवाय तालुक्याचे सभापती यांना विनंती केल्यानंतर यांनी विद्यार्थ्यांच्यासाठी विशेष सेनीटायझर स्प्रे मशीन उपलब्ध करुन दिले. ज्या विद्यार्थ्यांच्याकडे मास्क नव्हता किंवा परिस्थितीमुळे घेतला नव्हता त्यांना आमच्याकडून मास्क देण्यात आले.

४ ) वर्गविरहित वातावरणात शैक्षणिक साहित्याची कमतरता येणार होती.

- मराठी व गणित मधील प्रत्येक पहिले संबोध निर्माण करण्यासाठी शिवाय त्याचे दृढीकरण करण्यासाठी मुबलक प्रमाणात वैविध्यपूर्ण शैक्षणिक साहित्याचे आवश्यकता असते. वर्गात या गोष्टी सहज उपलब्ध आपण करून देत असतो. पण वर्गविरहित वातावरणातही नाविन्यपूर्ण व उपयुक्त साधनांचा विचार करण्यात आला. QR कोड सुविधा असणारा स्वनिर्मित 'शब्दतारका संच' या डिजिटल बुक प्रोजेक्ट चा वापर करण्यात आला. पालकांना मोबाईलवर सुलभपणे वापर करता यावा यासाठी त्याची सॉफ्ट कॉपी तयार करण्यात आली. या प्रोजेक्ट चा राज्यभरातही अतिशय प्रभावी वापर झाला. शिवाय QR कोड स्कॅन करणारे QR DROID हे ॲप सुद्धा सुरु करून दिले याशिवाय याच्या वापराबाबत प्रात्यक्षिक स्वरुपात मार्गदर्शन केले.

५ ) पायाभूत भाषिक क्षमता व भाषा समुद्धता यासाठी पूरक वाचन सामुग्री विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होण्यात अडथळा होता.

- मुलांना सहजपणे वाचन करता येईल शिवाय वाचनाची गोडी वाढेल असे उपयुक्त आणि आकर्षक असे वाचन कट्टे शालेय परिसरात उभे करण्यात आलेत. मुलांना वाचनाची गोडी निर्माण करण्यास व समृद्धता निर्माण करण्यास सदर उपक्रम खूप लाभदायक ठरले. याशिवाय लोकसहभागातून तरंग वाचनालय व Magazine Rack आदी. विशेष सुविधा निर्माण केल्या. मुलांना वाचनाचे एक उत्तम व्यासपीठ प्राप्त झाले वाचनाची आवड व रुची वाढली. शाळेत ग्रंथ संपदा विपुल झाली. नवोपक्रमास सदर बाब पूरक बनली.

६ ) आदर्श वर्ग निर्मिती पूर्वी इयत्ता १ ली साठी असणारा नियोजित वर्ग भौतिकदृष्ट्या अतिशय गैरसोईचा होता.

- लोकांचे श्रमदान व लोकसहभाग यातून वर्गाचा कायापालट या लॉकडाऊन काळात करण्यात आला. लाखो रुपये देणगी गोळा करून आवश्यक सर्व सुविधा वर्गात करण्यात आल्या. यामध्ये रंगकाम, संगणक, FAN, टाईल्स, स्मार्ट बोर्ड, फर्निचर, कपाटे, खुर्ची, आदी सर्व सुविधा निर्माण करण्यात आल्या.

- अभ्यासवर्गात अभ्यासपत्रकात दिलेल्या घटकांचे दृढीकरण चांगले व्हावे यासाठी स्वाध्यायपुस्तका सोडवून घेणे आवश्यक होते. शाळा बंद काळात शिक्षकाविरहीत अध्ययन करताना स्वाध्यायपुस्तिका सर्व मुलांना प्राप्त होणे आवश्यक होते या कारणास्तव प्रत्येक महिन्यात मुलांना स्वखर्चातून स्वाध्यायपुस्तिका घरपोच करण्यात आल्या. त्यामुळे उपक्रम अधिक यशस्वी झाला.

७ ) बहुदा पालकवर्ग सर्वसामान्य आर्थिक परिस्थिती असलेने सर्व विद्यार्थ्यांच्या जवळ पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नव्हते.

- वाढदिवस निमित्त मित्रांना शैक्षणिक साहित्य भेट देण्याची पद्धत सुरु केली. त्यातून सर्वांना आवश्यक साहित्य उपलब्ध झाले. शिवाय स्वखर्चातून मुलांना स्वाध्यायपुस्तिका

प्रदान करण्यात आल्या.

८) आपत्ती काळात मुलांना शिक्षणात निरसता येण्याची भीती वाटत होती .

- या आपत्ती काळातही मुलांना शिक्षणात गोडी वाढावी, रसिकता निर्माण व्हावी या शिवाय सहज सुलभ अध्ययन घडावे यासाठी काही प्रभावी प्रयत्न करण्यात आले. लोकसहभागातून एक लाख किमतीचा स्मार्टबोर्ड खरेदी करण्यात आला. त्याचा वापर करण्याची संधी मुलांना विशिष्ट वेळ ठरवून गट पद्धतीने देण्यात आली. त्याचा अतिशय चांगला आणि प्रभावी उपयोग मुलांच्या तयारी करिता आणि शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी झाला. याशिवाय अलेक्सा डिव्हाईस चा वापर देखील करण्यात आला.

## ❑ ६. उपक्रमाची फलनिष्पत्ती / यशस्विता (उदिष्टानुसार)

शाळा बंद असताना विविध माध्यमातून शिक्षण कसे प्रभावीपणे चालू ठेवता येईल. इयत्ता १ ली सारख्या महत्वपूर्ण वर्गाची सुयोग्य पायाभरणी व तयारी कशी घेता येईल ? यासाठी प्रत्यकाने आपल्या कल्पनेतून प्रयत्न केले. यात आमचाही हा अभिनव प्रयत्न आणि उपक्रम होता. ज्याचा नक्कीच आमच्या विद्यार्थांना चांगला लाभ झाला. विद्यार्थांना एक नवी आणि रंजक अनुभूती मिळाली. खरे तर या काळात मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये विद्यार्थ्यामध्ये झालेल्या गुणात्मक वाढीमुळे तसेच शिक्षणाच्या प्रवाहात सात्यत्य आणि अखंडत्व ठेवता आले. सर्व गोष्टी नियोजनपूर्वक करता आल्याने, पालकांची साथ व वरिष्ठांचे मार्गदर्शन प्राप्त झालेने या प्रयत्नात आम्ही यशस्वी होवू शकलो. आम्ही निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करू शकलो.....

**1. 'कोरोना / लॉकडाऊन काळात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या प्राथमिक अवस्थेत अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या अडथळ्यांचा शोध घेणे.**

सर्व शिक्षणाचा पाया अगर महत्वपूर्ण कक्षा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इयत्ता १ ली ची या शाळाबंद काळात तयारी घेणे एक प्रकारे एक आवाहनच होते. ज्या मुलाला शिक्षणाचा गंध नाही अशा बालकाला सुयोग्य प्रकारे घडवून अपेक्षित क्षमता आणि अध्ययन निष्पती साध्य करणे सामान्य गोष्ट नव्हती. या अवस्थेत मुलांची सुरवात ऑनलाईन माध्यमाद्वारे करणे अगर त्याचा अतिवापर देखील अयोग्य वाटत होता. मुलांना मोबाईल हाताळणे अगर आरोग्य समस्या लक्षात घेऊन कृती कार्यक्रम युक्त हा कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. या उपक्रमामुळे मुले हसत खेळत अध्ययन प्रणाली मध्ये सहभागी झाली. मुलांच्या मनात असणारी असुरक्षितेची भावना तसेच भीती कमी करण्यास सदर उपक्रम खूप लाभदायक ठरला. 'पहिले पाऊल' हा कार्यक्रम आनंद देणारा ठरला. कोरोना चा संसर्ग होऊ नये याकरिता वापरात आणलेली समूह केंद्र पद्धती तसेच सेनीटायजर मशीन सुविधा आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी उपयुक्त ठरले. विविध कार्यक्रमामुळे मुलांना शिक्षणिक सुविधा आणि साहित्य यांचा लाभ झाला.

**२. कोरोना / लॉकडाऊन काळात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची आरंभ काळात अध्ययन प्रक्रिया सहज, सुलभ आणि परिणामकारक होण्यासास्ठी विविध कृती कार्यक्रम तयार करणे.**

मराठी व गणित विषयावर आधारित विविध कृतीकार्यक्रम नियोजित करून क्रमबद्धतेने त्याची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे पायाभूत भाषिक क्षमता व अंकगणीतीय साक्षरता साध्य करणे सोपे झाले. स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य व इ साहित्य मुलांच्या प्रगती आणि गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त ठरलेत. वाचन कट्टा निर्मिती, भाषा समृद्धी कार्यक्रम, स्मार्ट बोर्ड तथा ICT साधनांचा प्रभावी वापर यामुळे मुलांना शाळा बंद काळातही प्रभावी आणि रंजक अध्ययन अनुभव मिळाले. पालकांच्या सुरु केलेल्या विशेष संवाद मालिकेमुळे सर्वांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन मिळाले. अपेक्षित कृती आणि प्रतिसाद प्राप्त करता आला. मुलांना देखील पालकांच्या समवेत उपक्रम करताना आनंद मिळाला शिवाय मुलभूत संबोध देखील पक्के होत गेलेत.

**३. पायाभूत भाषिक क्षमता, अंकगणितीय साक्षरता व अध्ययन निष्पती या गोष्टी साध्य करण्यासाठी योग्य वातावरण आणि संधी उपलब्ध करून देणे.**

उपक्रम अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण ज्ञानरचनावादी उपक्रम घेण्यात आलेत. शब्द बनवण्यासाठी कल्पकतेने अक्षरपट्ट्या बनवण्यात आल्या. त्यामुळे शब्द वाचन लेखन सहज सुलभ व योग्य गतीत साध्य झाले. शब्दतारका संच या डिजिटल बुक प्रोजेक्ट चा देखील चांगला लाभ झाला. परिसरात सहज पणे उपलब्ध होतील आणि पालक घरीच मुलासमवेत घेवू शकतील असे गणितीय खेळ आणि कृती उपक्रम करून घेतल्यामुळे अंकगणितीय साक्षरता निर्माण झाली. कृतियुक्त शिक्षण झाल्यामुळे इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन निष्पती देखील साध्य करता आल्या.

**४. कृती-कार्यक्रम व विविध उपाययोजनांच्या माध्यमातून प्राथमिक अवस्थेत आरंभीच्या काळात मुलांमध्ये झालेल्या गुणात्मक आणि भावनात्मक बदलांची परिणामकता अभ्यासणे.**

उपक्रमाच्या सुरवातीला विविध मूल्यमापनाची तंत्रे आणि साधने वापरून नोंदी करण्यात आल्या. यासाठी मुलाखत, निरीक्षण, प्रेक्षेपण तंत्र, समाजमिती तंत्र याशिवाय प्रश्नावली पडताळा सूची पदनिश्चयन श्रेणी प्रमाणित चाचण्या आदी. वापर करण्यात आला. सदर मूल्यमापनातून मुलांच्यामध्ये योग्य प्रकारचा गुणात्मक आणि भावनात्मक बदल झाल्याचे निष्कर्षात आले.

# नवोपक्रमबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय ....

Date:

YOUVA

नमस्कार सर.

मी जावके मॅडम.

सर आपले सर्वच उपक्रम खूपच प्रेरणादायी आहेत. त्यातील 'पक्का पाया पहिलीचा'...... जाणीव पहिला आकार देताना या उपक्रमासाठी आपण बनवलेला पक्का पाया पहिलीचा हा ग्रुप तयार करुन आपण खूप सुंदर काम केले आहे. कारण या ग्रुपमूळे राज्यातील विविध शिक्षकांचे विविध उपक्रम, त्यांनी आपल्या मुलांसाठी घेतलेली मेहनत, त्यांचे व्हिडीओ, PDF आम्हाला मिळतात. या ग्रुपमूळे मला माझ्या मुलांकडून भरपूर, नवनवीन उपक्रम मला घेता आले. त्याचबरोबर तुम्ही पहिलीच्या वर्गशिक्षकांना आदर्श वर्गनिर्मीती करता संवादातून प्रात्यक्षिक स्वरुपात जे मार्गदर्शन करता त्यामूळे भविष्यात बरेचसे म्हणण्यापेक्षा सर्वच शिक्षक पहिलीचा आदर्श वर्ग घडवतील यात शंकाच नाही.

अशा प्रकारचे अनेक उपक्रम आपल्या हातून घडो.

असेच मार्गदर्शन मिळत रहो हीच अपेक्षा.

धन्यवाद.

---

22:34 50%

**Rahul waghmare nanded**
online

उपक्रमाची ओळख

संकल्पना तथा संवादक
श्री.सचिन देसाई
9421114290

**व्हिडिओ लिंक :**
https://youtu.be/UOih7u_XHLM 20:58

You
https://youtu.be/UOih7u_XHLM
सचिन मी हे शेयर करु का 22:27

पुणे zp 22:27

Ok 22:27

खुप छान काम करत आहेस तू
या वर्षी मी प्रथमतः 1ली वर्ग घेतला आहे. मला याची नक्की जाणीव होती की सचिनकडे लोकडाउन मधे कसे शिकवायचे याचे उत्तर असेल... त्यामुळे बिनधास्त होतो. तसेच तुझ्यासारखे लोक जीव ओतुन मुला पर्यंत जाणारे खुप कमी आहेत. पण सार्थ अभिमान आहे की तुझ्यासोबत मी DEd केलेले आहे..
**You are genius......**
🌷🌷🌷🌷 22:31

Pune लाच आहे...👍 22:32

😊🙏🌹🌹 22:34

Type a message


---

22:00 56%

**Sambhaji Patil sir savrde**



10:42



YouTube

पक्का पाया पहिलीचा | संवाद १ ला | उपक्रमाचा उद्देश व दिशा | आजचा उपक्रम- 'माझी ओळख' | Sachin Desai |...
www.youtube.com

https://youtu.be/UOih7u_XHLM 14:19

**सचिन, पक्का पाया पहिलीचा या वैशिष्ट्यपूर्ण आणि नावीन्यपूर्ण उपक्रमाची जबरदस्त प्रस्तावना झाली आहे...**
**...... एवढ्या सहजतेने , अस्खलितपणे आणि सूत्रबद्ध मांडणीने प्रस्तावना प्रतिपादन करणे बोटावर मोजता येतील इतक्याच शिक्षकांना हे जमते... प्रचंड आत्मविश्वास सुद्धा जाणवला.... म्हणूनच तू राष्ट्रपती पुरस्कारासाठी पात्र आहेस....** 20:29

Type a message

---

**अस्लम महंमद कुठरेकर रत्ना...**



नमस्कार सर....
सर्व प्रथम आपले हार्दिक अभिनंदन करतो.प्रत्येक वेळी आपण काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवीन दिशा देण्याचे काम करीत असता ...
आपण शिक्षक आहोत आणि आपण काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शिक्षणाच्या प्रवाहात विद्यार्थ्यांना खिळवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे....आणि हेच काम आपण करीत आहात याचा सार्थ अभिमान आहे.........
आपल्या शब्द तारकांचे अनेक भाग आजही महाराष्ट्रातील अनेक शाळेत वापरले जात आहेत तेही प्रभावी साधन म्हणून....त्याचे एकमेव कारण म्हणजे दर्जेदार निर्मिती.हे भाग पूर्ण केल्यानंतर आपण न थांबता विद्यार्थी हाच केंद्रबिंदू डोळ्यासमोर समोर ठेवून संशोधनाच्या माध्यमातून काहीतरी न म्हणता गुणवत्तापूर्ण आणि बालमनाला आवडेल असे देण्याचा प्रयत्न करीत आहात.
ध्येयाने प्रेरीत होवून आणि मनाशी दृढ निश्चय करून आपण अशक्य ते शक्य करताना आदर्श

Type a message

माध्यमातून काहीतरी न म्हणता गुणवत्तापूर्ण आणि बालमनाला आवडेल असे देण्याचा प्रयत्न करीत आहात.
ध्येयाने प्रेरीत होवून आणि मनाशी दृढ निश्चय करून आपण अशक्य ते शक्य करताना आदर्श
शाळा नाही तर एक स्मार्ट आणि मॉडेल शाळा म्हणून अथक प्रयतनातून साकारली...
**ज्ञानदेवा रचिला पाया..**
**तुका झालासे कळस...!!!**
आज आपण पक्का पाया पहिलीचा उपक्रम सादर करताना विद्यार्थी आणि ऑनलाईन शिक्षण याबत व्यक्त केलेली शोकांतिका खरोखरच मनाला हूरहूर आणि पोटात भीतीचे गोळे निर्माण करणारी आहे. हे ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांना पुन्हा निरक्षरतेच्या दिशेने घेवून जात असल्याचे चित्र आज ग्रामीण भागातील आहे.....
विद्यार्थ्यांच्या मनातील शिक्षणाविषयी असणारी भिती दूर करताना त्यांच्याबरोबर चर्चा,गप्पा मारून त्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण करणारा आपला प्रयोग मनाला भावला....खूप लिहावेसे वाटत असतानाच थांबतो...
**पक्का पाया पहिलीचा....या नाविन्यपूर्ण उपक्रमाला माझ्या लाख लाख शुभेच्छा.....**
श्री.अस्लम कुठरेकर रत्नागिरी! 14:31

खुप सुंदर शब्दांकन👍🙏 14:37

मनापासून आभार 14:37

🙏🙏 14:37

# नवोपक्रमबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय ....

05:10 Anil Aade Dodamarg

संकल्पना तथा संवादक
श्री.सचिन देसाई
9421114290

**व्हिडिओ लिंक :**
https://youtu.be/UOih7u_XHLM
21:02

सर मी तुमचे प्रयत्न सातत्याने वाहतोय, तुमचे अनुभव वाचले आहेत आणि मी तुम्हांला प्रत्यक्षात भेटलो देखील आहे. तुमचे प्रयत्न प्रमाणिक आहेत.. तुमचा शिक्षण क्षेत्रातील अभ्यास फारच दांडगा आहे आणि शिकणे , शिकवणे, नवनिर्मिती करत राहणे हा तुमचा आत्मा आहे... शिक्षणाविषयी ऐवढी प्रमाणिक सेवा देणारा गुरुतुल्य मी पहिल्या वेळेस अनुभवतो ह्या शतकातील तुम्ही मला साने गुरुजी वाटलात.. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगती विषयी आपली तळमळीची तुलनाच करता येणार नाही.. मला देखील नवनवीन शिकायला खूप आवडत. मी विचार करतो की अरे मी सचिन सरांचा सहकारी शिक्षक असतो तर मला त्यांच्या कडून खूप काही शिकता आले असत... तुमच्यात प्रचंड स्वरूपाची शिक्षण क्षेत्रात बदल घडवून आणण्याची शक्ती आहे.. पक्का पाया पहिलीचा हया उपक्रम खूपच प्रभावी आहे. आपल्या माध्यमातून खूप साऱ्या शिक्षकांना योग्य दिशा मिळेल , नवनिर्मीती ची प्रेरणा मिळेल. आपल्या विषयी लिहण्या सारख खूप काही आहे.. आपण जे कराल ते सोन होत. आपण शिक्षण क्षेत्रातील जादुगार आहात..... पक्का पाया पहिलीचा ह्या उपक्रमाला माझ्या खूप खूप शुभेच्छा....
शुभ रात्री
वेळ :१०:५७
22:58

21:53 Narvade Hingoli

■ उपक्रमागील भूमिका
■ उपक्रमाची गरज व उपयुक्तता
■ उपक्रमाचे स्वरुप व दिशा
■ वर्गपूर्वतयारी अंतर्गत घ्यायच्या **'माझी ओळख'** ह्या विद्यार्थी उपक्रमाची ओळख

संकल्पना तथा संवादक
श्री.सचिन देसाई
9421114290

**व्हिडिओ लिंक :**
https://youtu.be/UOih7u_XHLM
21:00

You
दि. 26 जून, 2021
इयत्ता १ ली या पायाभूत कक्षेच्या वर्गशिक्षकांच्यासाठी एक नवा उपक्रम.. एक न...

🙏🙏💐💐💐 सर तुमची विद्यार्थ्यांसाठी असलेल्या तळमळी बद्दल करावी तितकी प्रशंसा कमीच आहे...सर तुमच्या हातून यापेक्षाही अधिक शैक्षणिक कार्य घडत जावो...तुमच्या नवनवीन उपक्रमाचा, कृतीचा, संकल्पनेचा, प्रयोगाचा, आम्हाला आमच्या शैक्षणिक कर्मभूमीत करता यावा....व यातून भावी पिढी निर्माण व्हावी ....पुढील वाटचालीसाठी आपणास खूप खूप शुभेच्छा..💐💐💐💐
21:37

Type a message

वाघ मैडम मंगळवेढा

संकल्पना तथा संवादक
श्री.सचिन देसाई
9421114290

**व्हिडिओ लिंक :**
https://youtu.be/UOih7u_XHLM
21:00

You
https://youtu.be/UOih7u_XHLM

नमस्कार सर,
**पक्का पाया पहिलीचा**
या उपक्रमांतर्गत पहिलीचा पाया पक्का कसा करायचा याचे एक उत्तम मार्गदर्शन आणि मार्गदर्शक म्हणजे तुम्ही आहात . बऱ्याच शिक्षक बंधु - भगिनींना पहिलीचा वर्ग म्हटले की त्यांना नेमकं कशाप्रकारे शिकवायचं, त्यां मुलांची एकाग्रता कशी टिकवायची, त्यांना कामामध्ये गुंतवून त्यांना शाळेविषयी आवड कशी निर्माण करायची हे आपल्या विविध उपक्रमातून आम्हां सर्वांना अनुभवयास मिळते . पहिलीच्या वर्गाला एक योग्य अशी दिशा मिळते . शिक्षणाच्या वाटेवर मूळ पायाच पक्का झाला तर ही मुले भविष्यात उत्तम रित्या यशस्वी होतील . . .
खूप छान उपक्रम💐💐💐
धन्यवाद !
22:56

TODAY

🙏😊💐 05:12

21:41 Shelke Dashrath online

दि. 4 जुलै, 2021
इयत्ता १ ली या पायाभूत कक्षेच्या
'वर्गशिक्षकांच्यासाठी' व 'पालकांच्यासाठी' एक नवा ...

🙏🙏 ***अतिशय सुंदर व्हिडिओ** 👌👌.
**पक्का पाया पहिलीचा हा what's app group तयार करून महाराष्ट्रातील माझ्या सारख्या तमाम शिक्षकांना पहिली साठी वेगवेगळे नवीन उपक्रम कसे घेता येतील यासाठी एक नवीन संधी दिल्याबद्दल मनापासून आभार..**
**या ग्रुप मुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील वेगवेगळे उपक्रम बघायला मिळत आहेत. याचा 100% उपयोग माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना होणारच.**
**तुझा हा नवीन उपक्रम बघून मला एक जुनी आठवण झाली.. मी शाळा कासारवाडी ता. माण येथे असताना आमच्या केंद्रातील शिक्षक आदरणीय प्रतिभा भराडे मॅडम यांनी राबवलेला उपक्रम बघण्यासाठी वाई तालुक्यातील निकमवाडी शाळेत गेलो तेव्हा तेथील पहीलीचे विद्यार्थी बघितले असता फक्त तीन महिन्यांत विद्यार्थी कोटी पर्यंतच्या संख्या वाचत होती, लिहीत होती. जोडाक्षरयुक्त शब्द वाचत व लिहीत होती. एवढेच नाही तर पहिली किंवा दुसरी वेलांटीच का द्यायची हे देखील सांगत होती. आम्ही हे सगळे बघून आश्चर्य झालो होतो.**
**सचिन तुझ्या या उपक्रमामुळे नक्कीच खूप चांगला फायदा आम्हा सर्वांना होईलच...**
**असो तुझ्या या शिक्षण क्षेत्रातील अमूल्य अशा योगदानाला मनापासून सलाम..**👏👏👏
13:47

Type a message

05:07 Ashwini Gardi

आजच्या सवादात जाणू ...
■ उपक्रमागील भूमिका
■ उपक्रमाची गरज व उपयुक्तता
■ उपक्रमाचे स्वरुप व दिशा
■ वर्गपूर्वतयारी अंतर्गत घ्यायच्या **'माझी ओळख'** ह्या विद्यार्थी उपक्रमाची ओळख

संकल्पना तथा संवादक
श्री.सचिन देसाई
9421114290

**व्हिडिओ लिंक :**
https://youtu.be/UOih7u_XHLM
21:01

1 UNREAD MESSAGE

TODAY

तुमच्या कल्पना अफलातून असतात त्यातून अलौकिकच निर्माण होणार. खरचं काळजी आणि टेंशन होत या लॉकडाउन मधील पहिलीच्या मुलांची प्रगती, त्यांच भविष्य कसं असणार पण आता खात्री आहे नक्कीच अफलातून च असणार.कारण तुमच्या मार्गदर्शनातून आणि पक्का पाया पहिलीचा ग्रुपमधून पूर्ण राज्यातील शिक्षकांचे उपक्रम आपण त्यांच्यासोबत घेणार आहोत.👍👍👍🙏🙏🙏
00:13

10:51 hembade sangli

सचिन सर नमस्कार
सर आपण शब्दतारका चा पहिला भाग प्रकाशित केला होता. तो एका ग्रुप मला मिळाला तो मला आणि माझ्या वर्गातील मुलांना प्रचंड आवडला त्यावेळेस आपल्या कडून आदर्श शैक्षणिक साहित्य आपल्याकडून मिळेल याची खात्री पटली लगेचच आपल्याशी संपर्क साधून ग्रुप मध्ये ॲड झालो. आणि त्यानंतर पुढचे सगळे शब्द तारकांचे वेगवेगळे भाग खूप छान मिळाले. त्यानंतर आपण सुरू केलेला ब्लॉग, स्मार्ट एज्युकेशन नावाने सुरू युट्युब चॅनेल, त्यानंतर आपण सुरु केलेले भाषणांची आदर्श मालिका, एक आदर्शवत शैक्षणिक साहित्याची मालिका आपण आम्हास विनाशुल्क दिलेली आहे. त्याबद्दल आपले शतशः आभार!!!
चालू शैक्षणिक वर्षामध्ये पहिलीचा वर्ग आदर्श कसा असावा याबद्दल विचार करत होतो. इतक्यात आपले व्हाट्सअप स्टेटस पाहिले पक्का पाया या नावाने आपण ग्रुप सुरू करणार आहात हे कळल्याबरोबर लगेच ग्रुप ला जॉईन झालो. आणि त्यावेळेस मात्र मी निश्चिंत झालो की आता आपल्याला या वर्षी सचिन सरांकडून इयत्ता पहिली साठी आदर्श शैक्षणिक साहित्य व मार्गदर्शन मिळेल खरच सर आपले मनापासून खूप खूप धन्यवाद
🙏🙏🙏🙏🙏
08:27

हेंबाडे सर,
आपल्या अमूल्य प्रतिक्रियेबद्दल मन:पूर्वक आभार
💐💐💐🙏🙏🙏
08:31

🙏 08:31

Type a message

# ❑ ७. समारोप

**'पक्का पाया पहिलीचा ... जाणीव पहिला आकार देताना'** या उपक्रमाची संकल्पना. खरे तर गरजेतून निर्माण झाली. कोणत्याही विद्यार्थ्याचा सुयोग्य सर्वांगीण विकास साधायचा असेल तर त्याची पहिली पायरी त्याचा हा पहिला पाया अर्थातच इयत्ता १ ली तील तयारी हि चांगलीच झाली पाहिजे. पहिलीत आदर्श घडलेला विद्यार्थी खऱ्या अर्थाने पुढील शैक्षणिक वाटचालीत देखील प्रगतशीलपणे वाटचाल करतो. १००% प्रगत वर्ग बनवण्याचे ध्येय या आपत्ती काळातही घेऊन ते यशस्वी करण्याची किमया या नवोपक्रमामुळे घडली. या शैक्षणिक सत्रात या उपक्रमाची अमलबजावणी केली. यात उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विद्यार्थी सर्व पालक यांचा सहभाग साधला. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचा खऱ्या अर्थाने समन्वय साधणारा हा नवोपक्रम होता. विद्यार्थ्यांना शिक्षणातील आनंद देणारा हा उपक्रम होता. शिक्षण चालू ठेवण्याबरोबर शिक्षण प्रक्रियेला गती देणारा हा उपक्रम होता. हा प्रवास सर्वांना सुखद वाटला. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वात विशेष आणि आनंदाची बाब म्हणजे या नवोपक्रमाची अंमलबजावणी करताना कोणालाही कोरोना या रोगाचा प्रादुर्भाव झाला नाही. या उपक्रमातून शिक्षणाच्या गोडी आणि गुणवत्ता वाढी सोबत लहान मुलांच्यामध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्याचा देखील प्रयत्न केला.

याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे सोशल मीडिया, ब्लॉग आणि YouTube channel च्या माध्यमातून या नवोपक्रमाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळे सदर उपक्रम कसा प्रभावी राबवता येईल याची संपूर्ण माहिती राज्यातील शिक्षकापर्यंत पोहचला. अनेक ऑनलाईन कार्यशाळा, वेबिणार यामधून शिक्षक तथा पालक यांच्याशी संवाद साधला. यु ट्यूब वर सुरु केलेली उपक्रम संदर्भातील संवाद मालिका प्रचंड लोकप्रिय ठरली. सदर उपक्रम राज्यभरातील शिक्षक आणि विद्यार्थी यांना लाभदायक आणि प्रेरणादायी ठरला याचा आनंद वाटतो. केवळ ऑनलाईन शिक्षणावर अवलंबून न राहता वंचित राहणाऱ्या मुलांच्यासाठी राबवलेला प्रयोग केवळ आपत्ती काळातच नाही तर सर्वसामान्य काळातही उपयुक्त असल्याचे स्वानुभवावरून जाणवले.

या उपक्रमामुळे मुलांनाशिकण्यात कंटाळा वाटला नाही. या उपक्रमाचा आदर्श इतर शिक्षकांनी आणि शाळांनी घ्यावा. शिवाय पालकांनी घ्यावा यासाठी मी निरंतर पप्रयत्नशील राहिलो आणि त्यात सफल ही झालो. आज हजारो शाळेत हा उपक्रम चालू आहे. त्यांना व पालकांना देखील सकारात्मक परिणाम घडून येत असल्याच्या प्रतिक्रिया निरंतर येत आहेत.

**या उपक्रमाचा आम्हास या आपत्ती काळात फायदा झालाच; शिवाय पुढील काळातही होत राहील. आता शाळा नियमित सुरु झालेवरही दीर्घकालीन सुट्टीत, अथवा शाळेतच विशेष सप्ताह आयोजन करुन या नवोपक्रम संकल्पनेवर आधारित कोणीही आपल्या शाळेत मुलांना शिक्षण समृद्ध करणारा असा एक आगळा वेगळा अध्ययन कृती कार्यकम आखू शकतो. यासाठी नक्कीच हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व शिक्षक बांधवासाठी दिशादिशादर्शक राहील याची खात्री आहे**

# ❑ ८. संदर्भसूची व परिशिष्टे

‘ पक्का पाया पहिलीचा जाणीव पहिला आकार देताना’ सदर उपक्रम राबवण्यापूर्वी तसेच राबवत असताना अनेक संदर्भ साहित्याचे वाचन केले ज्यामुळे मला नवोपक्रम राबवण्याची तसेच त्याच्या अहवाल लेखनाबाबत योग्य मार्गदर्शन व दिशा मिळाली. नवोपक्रम राबवताना कोणत्या पायऱ्यांनी जावे ? कोणती साधने वापरावीत ? कोणाकोणाची मदत घ्यावी ? अशा अनेक प्रश्नाची उकल झाली. माझा हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी खालील संदर्भ साहित्याचे मला मोलाचे योगदान लाभले.


- **जीवन शिक्षण मासिक** – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे (माहे जून 2021 व जुलै 2021 )
- **शिक्षण संक्रमण मासिक**- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे (जुलै 2021)
- **उपक्रमशीलतेकडून कृतिशीलतेकडे** – सिद्धराम माशाळे , अभिषेक प्रकाशन
- **शैक्षणिक कृतिसंशोधन** - भा. गो. बापट, नूतन प्रकाशन पुणे, 1984
- **कृती संशोधन नवोपक्रम** - स्वाती गाडगीळ, सुविचार प्रकाशन (2006 )
- **कृती संशोधन व नवोपक्रम** – व. झा. साळी व सुरेश करंदीकर, फडके प्रकाशन , (2006)
- **दिशा नवोपक्रमाच्या** -संपादक शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. (2015)
- **स्वअध्ययन साहित्य निर्मिती हस्तपुस्तिका 1 ते 4**
- **नवोपक्रम प्रकल्प उपयोग , चित्रलेख प्रकाशन** – डॉ. सुधाकर गायकवाड
- **शिक्षा मे नवाचार** – सुरेश शिंगणे, तन्मय प्रकाशन, , 2014
- **ध्यास गुणवत्तेचा शोध नवोपक्रमशीलतेचा** - शामुकांत रुळे, प्रशांत पब्लिकेशन 2016

# परिशिष्ट - अ

**'पक्का पाया पहिलीच ... जाणीव पहिला आकार देताना'** या उपक्रमा संदर्भातील तपशीलवार माहिती व पुरावे आपणास खालील यादीद्वारे सहजपणे दृष्टीक्षेपात येईल.

| अ. क्र. | नवोपक्रम माहिती / पुरावे / स्वनिर्मित ई-साहित्य / स्त्रोत | लिंक |
|---|---|---|
| १ ) | नवोपक्रमबाबत संपूर्ण माहिती संदर्भ व्हिडिओ संग्रह | https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzNRRI9glolHet06XTww1cr |
| २ ) | संवाद क्र 1 । उपक्रमाचा उद्देश व दिशा : संवादक - सचिन देसाई | https://youtu.be/UOih7u_XHLM |
| ३ ) | संवाद 2 रा । लेखनपूर्व तयारी : कृती, उपक्रम व आनंददायी खेळ । संवादक- सचिन देसाई | https://youtu.be/dsd70I27nYk |
| ४ ) | संवाद 3 रा । लेखनाची पहिली सुयोग्य पकड व पहिले लेखन संस्कार संवादक- सचिन देसाई | https://youtu.be/loFLJrXcxVc |
| ५ ) | संवाद 4 था । एक अंकी संख्या व दशक यांचा पहिला संबोध व दृढीकरण । संवादक- सचिन देसाई | https://youtu.be/dOx3Sd29-8A |
| ६ ) | मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई-साहित्य ( पीडीएफ व फ्लिपबुक आवृत्ती ) | https://desaisachin.blogspot.com/2020/10/my-digital-book.html |
| ७ ) | मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई-साहित्य ( व्हिडिओ आवृत्ती ) | https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onny327VPtalw_A0pQi-UkRBi |
| ८ ) | 'WORLD OF WORDS' E-CONTENT FOR ENRICH VOCABULARY: | https://desaisachin.blogspot.com/2019/07/blog-post.html |
| ९ ) | नवोपक्रमसाठी शै.साहित्य व ई-साहित्य वाटप कार्यक्रम (pdf) | https://drive.google.com/file/d/1kfCWZ6qSyGWnpfuTlAtNAGoSzzwKpYJw/view?usp=sharing |
| १० ) | नवोपक्रम यशस्वीतेसाठी पूरक ई-साहित्य म्हणून तयार केल्याल्या QR कोडयुक्त डिजीटल बुकचा वापर विद्यार्थ्यांनी स्वघरी कसा केला ? याचे प्रात्यक्षिक (video) | https://youtu.be/3p4UD6mXfsI |

| अ. क्र. | नवोपक्रम माहिती / पुरावे / स्वनिर्मित ई-साहित्य / स्त्रोत | लिंक |
|---|---|---|
| ११ ) | माझी ओळख । विशेष नवोपक्रम अंतर्गत उपक्रम पक्का पाया पहिलीचा | https://youtu.be/lHrlmB-pkLk |
| १२ ) | एक अंकी संख्या दृढ़ीकरण कृती उपक्रम | https://youtu.be/ESPgeJqbxWQ |
| १३ ) | गणितीय साक्षरता पूरक खेळ | https://youtu.be/2reyAyGwHQw |
| १४) | भाषा समृद्धी करिता वाचन कट्टा निर्मिती | https://youtu.be/X1bi4Liv7sQ |
| १५ ) | शॉर्ट व्हाइट बोर्डचा लेखन सराव साठी उपयोग | https://youtu.be/oP4MhVtn52M |
| १६ ) | दशक संबोध कृती क्र 1 | https://youtu.be/lbqST5f_rnc |
| १७) | दशक संबोध कृती क्र 2 | https://www.youtube.com/watch?v=l43HOqFFyFQ |
| १८ ) | नवोपक्रम अंतर्गत मुलांच्यासाठी मोफत स्वाध्याय पुस्तिका वाटप व इतर कृती कार्यक्रम व विद्यार्थी स्पर्धा | https://drive.google.com/file/d/135jmqmRn2SMA8LGrhryQoC6H2gIwcD9L/view?usp=sharing |
| १९ ) | लोकसहभागातून कोरोनो आपत्ती काळात साधलेला शाळेचा शैक्षणिक विकास | https://drive.google.com/file/d/1E1K_ybISsWPKUy6BAe5MR4B8pLWqrYof/view?usp=sharing |
| २० ) | एक शिक्षक म्हणून माझे शिक्षण क्षेत्रातील प्रवास व योगदान | https://drive.google.com/file/d/1h7KLj4T5Ut78Fd_LSj9gdcaRc-okOAHk/view?usp=sharing |

| अ. क्र. | नवोपक्रम माहिती / पुरावे / स्वनिर्मित ई-साहित्य / स्त्रोत | लिंक |
|---|---|---|
| २१ ) | एक ते दहा व शून्य संबोध । कृतियुक्त गाणे | https://youtu.be/Z-RexIJs21M |
| २२ ) | ध्वनिभाषा द्वारा संख्या संबोध | https://youtu.be/SV5_L2wHIoc |
| २३ ) | अंककार्डे वापरून गणितीय साक्षरतेसाठी कृतियुक्त खेळ | https://youtu.be/cJ0fG0lSqGc |
| २४) | 'रचनावादी अक्षर कार्ड' हा उपक्रम व्हिडिओ | https://youtu.be/sel64a9Z8ZU |
| २५ ) | स्मार्ट बोर्ड द्वारे वाचन लेखन गणित सराव | https://youtu.be/jPti5oQbcfE |
| २६ ) | लोकसहभागातून मुलांच्या गरजा पूर्ण | https://youtu.be/hOi-8u_7Cyg |
| २७) | | |
| २८ ) | | |
| २९ ) | | |
| ३० ) | | |

# परिशिष्ट - ब

मुलांच्या मूल्यमापनासाठी मुलाखत तथा निरीक्षण पद्धती वापरण्यात आली. यामध्ये मुलांना मुलांना काही प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नावली मधील काही नमुना प्रश्नखालीलप्रमाणे...

१ ) तुमच्या  कुटुंबात कोण कोण आहे ?
२ ) तुला कोणती गोष्ट करण्यास जास्त आनंद वाटतो ?
३ ) तुला कोणत्या गोष्टीची भीती वाटते ?
४ ) घरातील वस्तूंची संख्या विचारणे
५ ) तुला कोणता रंग आवडतो ?
६ ) तुझा आवडता खेळ कोणता ?
७ ) मोबाईल चा वापर कशासाठी करतो ?
८ ) हाताला बोटे किती आहेत ?
९ ) पाच बोटे दाखव
१० ) आपल्याला डोळे किती आहेत ?
११ ) आपल्याला नाक किती आहेत ?
१२ ) दाखवलेल्या दोन्ही शब्दात समान असणारे अक्षर कोणते ? (शब्द्कार्डे दाखवून )
१३ ) तुला माहित असलेली एखादी गोष्ट सांग
१४ ) तुला माहिती असलेले एखादे गीत म्हण
१५ ) काड्यापासून दशक तयार कर
१६ ) यातील लहान वस्तू कोणती ती उचल
१७ ) रंगानुसार बटणाचे गट तयार कर
१८ ) जवळ दूर वर आधारित तोडी प्रश्न
१९ ) बेरजेवर आधारित व्यावहारिक जीवनातील शाब्दिक प्रश्न विचारणे.
२० ) वजाबाकी क्रियावर आधारित व्यावहारिक जीवनातील शाब्दिक प्रश्न विचारणे.

# नवोपक्रम सहभागी विद्यार्थी यादी

या नवोपक्रममध्ये शाळेतील इयत्ता १ ली च्या सर्व १३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या नवोपक्रमाचा त्यांना सकारात्मक लाभ झाला त्यांची यादी खालीलप्रमाणे........

| अ. क्र. | विद्यार्थी नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | पाटील साईराज सुनिल | १ ली |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | १ ली |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | १ ली |
| ४ | वांजोळे विराज विजय | १ ली |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | १ ली |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | १ ली |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | १ ली |
| ८ | संकपाळ शुभम बबन | १ ली |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | १ ली |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | १ ली |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | १ ली |
| १२ | संकपाळ शिवन्या शिवाजी | १ ली |
| १३ | वांजोळे अथर्व दीपक | १ ली |

# परिशिष्ट - क

## नवोपक्रम अंतर्गत महत्वाचे कृती कार्यक्रम

**पक्का पाया पहिलीचा ....जाणीव पहिला आकार देताना'** या नवोपक्रम अंतर्गत महत्वाचे कृती कार्यक्रम घेण्यात आलेत त्याबाबतची माहिती....

### कृती उपक्रम क्र. १

- **नाव :** 'लेखनपूर्व तयारीसाठी व बोटांमध्ये सहजता, लवचिकता यावी यासाठी उपयुक्त खेळ खेळणे'
- **साधने :** लसूण, कागद, रांगोळी, माती, शेंगा, गंगावण ( वेणी )इत्यादी.
- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) शिक्षक घरातील या सहज सुलभ साधनाद्वारे कृती कशी करायची याबाबत माहिती देतात.

२ ) संकल्पना परिपूर्ण समजावी यासाठी प्रात्यक्षिक कार्याचा व्हिडिओ देखील पालकांना दाखवतात.

३) पालकांच्या समवेत मुले घरी कृती कार्यक्रम कसे करायचे या बाबत सूचना देतात.

४ ) एखादे साधन उपलब्ध नसेल तर पर्यायी साधन कोणते वापरावे याबबत माहिती देतात.

५ ) कृती झालेनंतर मुलांचा अनुभव तथा त्याचे फोटो किंवा व्हिडिओ शूट मागवून घेणे

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुले सुचनेनुसार साहित्याचा वापर करत दिलेल्या कृती क्रमवार करतात.

२ ) लसून सोलणे, शेंगा सोलणे, माती अथवा रांगोळी यावर बोटे फिरवणे, बोटांचा वेगवेगळा वापर करत कागद फाडणे, बोटांनी शेंगा फोडणे, मातीच्या वस्तू बनवणे शिवाय केसांचे गंगावण उपलब्ध झाले तर वेणी घालणे असे कृती कार्यक्रम करतात.

३ ) कृती करताना काही अडचण आल्यास पालकांची मदत घेतात.

४ ) खेळ खेळून झालेवर बोटांची सुयोग्य पकड करण्याचा प्रयत्न करतात.

5 ) सोपे आकार, रेषा काढण्याचा अथवा गिरवण्याचा मुले प्रयत्न करतात.

- **वेळ :** २ तास
- लिंक :

https://youtu.be/dsd70I27nYk

## कृती उपक्रम क्र. २

- **नाव :** एकाग्रता व सुसूत्रता वाढीसाठी मनोरंजक खेळ खेळणे
- **साधने :** सुई, दोरा, बाटली, पाणी , रंगीत बटण, मणी, किल्ली, इत्यादी.

- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) डोळे यांनी बोटे यांच्या सुसूत्रता आणि एकाग्रता यासाठी आवश्यक कृती उपक्रमांची यादी करणे.

२ ) संकल्पना परिपूर्ण समजावी यासाठी प्रात्यक्षिक कार्याचा विशेष संवादसहित व्हिडिओ देखील पालकांना दाखवतात.

३) पालकांच्या समवेत मुले घरी कृती कार्यक्रम कसे करायचे / शिवाय कोणती काळजी घ्यावयाची या बाबत सूचना देतात.

४ ) काही कृती उपक्रम समूह अध्यापन केंद्रावर घेतात.

५ ) कृती झालेनंतर मुलांचा अनुभव विचारतात.

६ ) पालकांना अश्या कृती वारंवार घेण्याबाबत सूचित करतात.

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुले सुचनेनुसार पालकांनी समजावल्याप्रमाणे साहित्याचा वापर करत दिलेल्या कृती करून दाखवतात.

२ ) बाटलीत पाणी ओतणे, सुईत दोरा ओवणे, रंगानुसार बटण अथवा वस्तूंचे वर्गीकरण करणे, किल्ली अगर छोट्या वस्तू घेऊन त्याच्या कडा गिरवणे असे कृती कार्यक्रम करतात.

३ ) कृती करताना काही अडचण आल्यास पालकांची मदत घेतात अथवा शिक्षकांना शंका विचारतात.

४ ) आपला अनुभव शिक्षकांना आपल्या शब्दात सांगतात.

5 ) या सारख्या इतर कृती उपक्रमाची माहिती जाणून घेतात.

- **वेळ :** २ तास
- लिंक :

https://youtu.be/dsd70I27nYk

## कृती उपक्रम क्र. ३

**नाव :** 'डिजिटल बुक च्या सहाय्याने भाषा वाचन-लेखन विकास साधणे'.

**साहित्य :** QR सुविधा असलेली LAMINATION केलेला अध्ययन कार्ड संच, स्मार्ट फोन.

- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) मराठी शब्दसंग्रह असणारे वाचन कार्ड्स संच बनवणे, त्यावर आधारित व्हिडिओ बनवून कार्डवर QR सुविधा देवून तो You Tube च्या सहाय्याने लिंक करणे.

२ ) विद्यार्थ्यांना वाचन कार्ड संच उपलब्ध करून देणे.

३) QR कोड स्कॅन करून कशी अनुभूती घेता येते याची प्रात्यक्षिक अनुभूती देणे.

४ ) मार्गदर्शन व्हिडिओ पाहून स्वतः वाचन लेखन सराव करावयास सूचना देणे.

५ ) शब्दांचे डोंगर, ज्ञानरचनावादी खेळ आदी. गोष्टी या गोष्टी कार्ड वरील सूचना पालन करतात का ? स्वाध्याय सोडवतात का याचे निरीक्षण करणे.

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) QR कोड स्कॅन करून विद्यार्थी चौदखडी वर आधारित व्हिडिओ आनंदपूर्वक पाहतात.

२ ) स्वतः शब्दांचे वाचन लेखन करतात

३ ) अध्ययन कार्ड वर दिलेल्या सूचनेनुसार स्वाध्याय सोडवतात.

४ ) अध्ययनात अडथळा आल्यास शिक्षकांना शंका विचारतात.

- **वेळ :** १ तास

लिंक : https://youtu.be/3p4UD6mXfsI

# कृती उपक्रम क्र. 4

- **नाव** : ‘सुवाच्छ आणि वळणदार लेखनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम.
- **साधने :** lamination paper, मार्कर, डाळ, गुंडाळी फलक, डॉटेड फॉन्ट प्रिंट्स, फुले, धान्ये इत्यादी.
- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) लेखन पूर्व तयारी करिता डॉटेड फॉन्ट आकार व अक्षराच्या प्रिंट्स काढून त्या Laminate करणे.

२ ) सदर Laminated कार्ड वर मार्कर द्वारे गिरवून पुन्हा पुन्हा वापर व सराव कसा करता येतो याबाबत पालकांना सविस्तर माहिती देणे.

३ ) अक्षरावर डाळी कश्या चिकटवायाच्या तथा क्रमाने धान्ये कशी ठेवायची याचे प्रात्यक्षिक मुलांना समूह अध्यापन केंद्रावर दाखवले जाते.

४ ) मुलांना गुंडाळी फलक वाटप करून त्यावर लेखन सराव कसा कारायचा ? याचेही प्रात्यक्षिक घेतले जाते.

५ ) सुलेखन वहीत कशा पद्धतीने लेखन करायचे याबाबत माहिती सांगितली जात्ते.

६ ) पालकांच्या साठी विशेष संवाद्पर मार्गदर्शक व्हिडिओ बनवून मार्गदर्शन केले जाते.

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुले Laminated कार्ड वर मार्कर द्वारे गिरवून अक्षरांचे आकार समजून घेतात.

**२ )** कागदावर सूचना दिल्याप्रमाणे अक्षर काढून क्रमाने त्यावर बिया चिकटवतात.

३ ) फरशीवर देखील क्रमाने अक्षरावर धान्य ठेवतात.

४ ) गुंडाळी फलकावर मोठ्या आकारात अक्षर रेखाटनाचा सराव करतात.

५ ) फुलाच्या पाकळ्या अथवा मणी क्रमाने मांडून देखील गणित अंकलेखन करतात.

- **वेळ :** २ तास





## कृती उपक्रम क्र. ५

**नाव** : वस्तूंच्या सहाय्याने दशक व शून्य संबोध समजावून घेणे.
**साधने :** काड्या, रबर, मणी, दोरा, शोर्ट व्हाईट बोर्ड, चेंडू, चमचा, पाने, चमचा, नाणी इत्यादी.

- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) वस्तूंचा वापर करून, १० चा गठ्ठा करून दशक कसा तयार होतो याची माहिती देतात.
२ ) दशक बनवण्यासाठी कोणकोणत्या वस्तूंचा वापर करता येतो याची माहिती व यादी पालकांना देणे.
३ ) प्रात्यक्षिक कृती करिता मार्गदर्शक व्हिडिओ दाखवतात.
४ ) समूह अध्यापन केंद्रात कृतियुक्त खेळाची माहिती देणे.
५ ) पाने, काड्या, चमचे, नाणी, यांच्या वापर करून दशक बनवून दाखवणे.

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुले अंकलेखन करून त्याच्याइतक्याच वस्तू त्याच्या समोर ठेवतात.
२ ) काड्या तथा चमचे यांचे १० प्रमाणे गठ्ठे बांधून दशक संकल्पना समजून घेतात.
३ ) शून्य संकल्पना व दशक संकल्पना समजेल असे कृतीयुक्त खेळ आणि गाणी सादर करतात.
४ ) संख्येइतकी वस्तू मांडणी अथवा वस्तू मोजून संख्या सांगणे यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.
५) वहीत अंकलेखन करून त्यासमोर १ ते ९ अंक व दशक मांडणी करतात.
**वेळ :** १ तास

**लिंक :**

| | |
|---|---|
| दशक संबोध कृती क्र 1 | https://youtu.be/lbqST5f_rnc |
| दशक संबोध कृती क्र 2 | https://www.youtube.com/watch?v=l43HOqFFyFQ |

## कृती उपक्रम क्र. ६

**नाव** : अध्ययनात सहजता, सुलभता आणि रंजकता येण्यासाठी ICT सुविधा आणि साधनांची उपलब्धी आणि सुयोग्य वापर करणे.

**साधने :** स्मार्ट बोर्ड, स्मार्ट फोन, स्मार्ट टी. व्ही. अलेक्सा डिव्हाइस इत्यादी.

- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) लोकसहभागमधून स्मार्ट बोर्ड तथा इतर आय. सी. टी. साधने उपलब्ध करण्याबाबत सामाजिक आव्हान करणे.

२ ) स्मार्ट बोर्ड चा तथा अलेक्सा डिव्हाइस चा वापर इयता १ ली साठी कसा करता येतो याबबत मुलांना आणि पालकांना मार्गदर्शन करणे.

३ ) अपेक्षित पायाभूत क्षमता आणि अध्ययन निष्पती साध्य करण्यासाठी आवश्यक टूल्स (pcschool) आणि सोफ्टवेअर स्मार्ट बोर्ड व स्मार्ट फोन मध्ये उपलब्ध करणे.

४ ) मुलांचे वाचन, लेखन, संभाषण व अंकगणितीय साक्षरता सध्य करण्यासाठी सदर साधनाद्वारे घेता येतील अश्या उपक्रमांची यादी करणे. वेळापत्रक ठरवून प्रत्येक मुलांना संधी मिळेल असे ठरविक वेळेचे नियोजन करणे.

५ ) विद्यार्थ्याच्यासाठी पूरक असे व्हिडिओ आणि इतर उपयुक्त ई- साहित्य बनवणे.

- **विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुले सुचनेनुसार स्मार्ट बोर्ड चा वापर करतात. त्यावरील activity मध्ये उत्साहाने सहभागी होऊन पूर्ण होतात.

२ ) साधने हाताळत असताना काही अडचण वाटल्यास आपला गटप्रमुख अथवा शिक्षक यांच्याकडून शंकानिरसन करून घेतात.

३ ) स्मार्ट बोर्ड वरील मोठ्या आकारातील अक्षरांचे तथा शब्दांचे सुलभपणे वाचन व टचस्क्रीन पद्धतीने सहज लेखन करतात.

४ ) अल्फाबेट लेखन सरावाकरिता स्मार्ट बोर्ड टूल्सचा वापर करतात. क्रमाने लेखन करण्यात प्राविण्य संपादित करतात.

५ ) शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अलेक्सा डिव्हाईस चा वापर करतात. संभाषण उपक्रमात सहभाग घेतात.

**लिंक :** https://youtu.be/jPti5oQbcfE

## कृती उपक्रम क्र. ७

**नाव** : भाषा समृद्धता तथा पायाभूत भाषिक क्षमता करिता आनंददायी वाचन प्रकल्प

**साधने :** अक्षर कार्डे, शब्दकार्डे, चार्टस, तक्ते, तरंग वाचनालय स्टंण्ड, Magazine Rack, वाक्यपट्ट्या, वृत्तपत्रे कात्रणे, डिंक, कात्री इत्यादी.

- **शिक्षक कृती /टप्पे :**

१ ) वाचन सराव घेता येईल अशा उपक्रमांची यादी करणे.

२ ) वाचन प्रकल्प करिता लागणाऱ्या साहित्याची यादी बनवणे.

३) मुलांना वाचनाची संधी मिळावी, आवड निर्माण व्हावी यासाठी योग्य प्रकारे साहित्याची मांडणी करणे. रचना करणे.

४ ) प्रकल्पामध्ये प्रत्येक मुलांना सुरक्षित वातावरणात संधी मिळावी यासाठी वेळापत्रके तयार करणे.

५ ) प्रकल्प अंतर्गत कार्यवाही कशी करावी याबाबत विद्यार्थी व पालक यांना सूचना देणे.

६ ) वाचन प्रकल्प कृती कार्यक्रम वेळी पर्यवेक्षक म्हणून जबाबदारीने काम करणे.

७ ) वाचनाची गती कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावाकरिता वाचनाची अधिक संधी देणे.

**विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) विशिष्टपूर्ण अक्षरकार्डपासून मुले शब्द बनवतात, वाचतात व लेखन करतात.

२) शाळा परिसरात वैशिष्टपूर्ण व आकर्षकपणे उभारलेल्या वाचन कट्ट्यावरील शब्दकार्डांचे वाचन करतात. (मोठ्या कागदी पुठ्ठ्यावर/भिंतीवर शब्द्कार्ड चे प्रिंट्स चिकटवले जातात)

३ ) मुलांना आकर्षण करतील अशी तरंग वाचनालये शाळा परिसरात अथवा समूह अध्यापन केंद्रावर उभारली गेली. त्याचा वापर वाचनासाठी करतात. त्याचबरोबर Magazine Rack चाही वापर करतात.

४ ) ज्ञानरचनावादावर आधारित अक्षरकार्डापासून शब्द निर्मिती करून वाचन व लेखन करतात.

५ ) डिजिटल बुक तथा स्लाईड शो मध्ये दाखवलेल्या शब्दांचे वाचन करतात.

**लिंक :** https://youtu.be/X1bi4Liv7sQ



# परिशिष्ट - ड

## नवोपक्रमात सहभागी शाळा यादी

या नवोपक्रममध्ये राज्यातील अनेक शाळा सहभागी होऊन त्यांनी देखील आपल्या शाळेत सदर उपक्रम राबवला अशा शाळांची यादी खालीलप्रमाणे........

| शाळा नाव | |
|---|---|
| Marathi Vidyamandir Rajapur<br>कुमार वि.मं.दानोळी नं. 1<br>Z.p.school ,ghanvatmala (Bagani)<br>Z P.Upper.Pri..School Kolona chore<br>जि प प्रा शा राजेगाव<br>Z.p.p.s Mahadevnagar<br>Z.P.P.S.Ghansargaon<br>ZPPS राजपिंपरी<br>Z.p.school Khirpuri Khurd<br>Z.P.School Vinchur<br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनवडेवाडी<br>Vidya Mandir Mahadikwadi<br>V.M.Akurde<br>Vidya Mandir Donvade<br>Z P Upper pri.School Pipri<br>Z. P. Primary school Bopapur (dighi)<br>Kanya vidya mandir vasagade<br>जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. परतूर<br>Z.p.upper primary school chanki<br>Vidya mandir kondigre .Tal shirol<br>Z.pp school Kaudgav<br>जिल्हा परिषद शाळा नंबर २ आकिवाट<br>Z.P.H.S. SAHAPUR TQ. DEGLOOR<br>Kumar v. M. Dattwad<br>विद्या मंदिर अनफवाडी<br>लंगडी<br>जिल्हा परिषद शाळा हनुमंतवाडी (सोमंथळी )तालुका - फलटण<br>पिंपळगाव माळवी<br>ZPPS Shirgaon Kondoshi<br>Z.P.P.SCHOOL NARODEVASTI(PATHRE BU)<br>कन्या वि.मं. मुरगूड. ता.कागल..<br>जिल्हा परिषद शाळा आग्रीपाडा<br>जि प उच्च प्रा शाळा जाजनुर ता निलंगा<br>dr APJ ABDUL KALAM N P URDU SCHOOL NO 57 ICHALKARANJI<br>विद्या मंदिर फये गावठाण<br>Z. P. P. S., Gulabharivasti<br>जवाहर विद्या मंदिर एरंडोळ | |

# नवोपक्रमात सहभागी शाळा यादी

या नवोपक्रममध्ये राज्यातील अनेक शाळा सहभागी होऊन त्यांनी देखील आपल्या शाळेत सदर उपक्रम राबवला अशा शाळांची यादी खालीलप्रमाणे........

| शाळा नाव | |
|---|---|
| वि मं.जांभळी नं३<br>आनंदीबाई कर्वे वि.मं.क्र.10 इचलकरंजी<br>जि . प . प्राथ.शाळा जलशुद्धीकरण विळद ता जि अहमदनगर<br>Z. P. Primary School Songaon<br>Z.p.pri school vajirkhede taluka Malegaon<br>Z p school Nandrahaveli<br>ZPPS KONDHE NO.3<br>Kanya vidya mandir Shirati<br>Z.p.pri.school Lakshmi Narayanpur<br>जि प शाळा गयाचीवाडी ता दिंडोरी जि नाशिक<br>जि.प.प्रा.शाळा धुत्रोली मराठी ता.मंडणगड<br>Z P P School Hajjapur<br>जि प शाळा रोटवद , ता . जामनेर<br>जि.प.शाळा धुंदलवाडी ता डहाणू जि.पालघर<br>जि.प.प्राथमिक शाळा - मनेगाव ता.सिन्नर.जि.नाशिक<br>V.M.Laxminagar Bhadgaon<br>जि.प.इंदिरा गांधी प्राथमिक शाळा आष्टी<br>Z P School Pangari Mokhada<br>जि.प.प्राथमिक शाळा - मनेगाव ता.सिन्नर जि.नाशिक<br>जि प शाळा मालदन<br>Kumar v m kacbha Thane<br>Z.P.P.S.NEWASA BUDRUK<br>Zpps Hanvatkheda<br>जि. प. प्राथमिक शाळा पेंडुर नाईकवाडी<br>Kendra Shala Minche Kh Bhudhgard<br>Z.p.p.school Deshmanewasti<br>Vidya Mandir Vikaswadi Savarde BuII<br>जि.प.शाळा सरवली<br>N.P.U.P.and Secondary School No.2,Darwha.<br>विद्या मंदिर कासारवाडी<br>शाळा no 2हेरले<br>Z.p.Upper primary school Moi<br>सा. जि.प. प्रा.केंद्रशाळा कुडाळ<br>जि. प.प्रा. शाळा नानेगाव<br>Vidya Mandir Pirachiwadi<br>Z.P.Central School .Mokhada .<br>ZPPS नरसिंहपूर | |

# नवोपक्रमात सहभागी शाळा यादी

या नवोपक्रममध्ये राज्यातील अनेक शाळा सहभागी होऊन त्यांनी देखील आपल्या शाळेत सदर उपक्रम राबवला अशा शाळांची यादी खालीलप्रमाणे........

| शाळा नाव | |
|---|---|
| विद्या मंदिर आवंडी धनगरवाडा नंबर एक तालुका आजरा<br>कुमार विद्या मंदिर तेरवाड<br>चाफवली नं.१<br>Lanja<br>zpps khadi<br>रा. ना. बोमडयाल प्राथमिक शाळा ,सोलापूर<br>Prathmik Vidya Mandir Laman Vasahat Dharangutti<br>श्री . सदगुरु बाबामहाराज सहस्त्रबुद्धे विद्यामंदिर<br>Z P P S Desur<br>St.peter church marathi pratmik shala Arnala<br>zpps katewadi<br>Vidya Mandir Bandiwade No.1<br>विद्या मंदिर सोनाळी<br>विद्यामंदिर चित्रानगर<br>जिल्हा परीषद प्राथमिक शाळा कोरेगाव मूळ ता . हवेली जि पुणे .<br>जि .प .शाळा गया ची वाडी.<br>विद्या मंदिर जी.के.नगर तारदाळ<br>जि प प्राथ शाळा राऊत वस्ती<br>श्री महालक्ष्मी वि.मं.कोकिसरे<br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किरपे. तालुका कराड<br>जि. प. शाळा वाल्मिकीनगर वांगी नंबर ५<br>Z P Pri School Vanasgaon Tal Niphad Dist Nashik<br>जि. प. शाळा आसोली सक्राळ<br>विद्या मंदिर बशाचामोळा | |

# शाळा उपक्रम बाबत आलेल्या बातम्या

## बशाचा मोळा शाळेस सॅनिटायजर स्प्रे मशीन भेट

वार्ताहर
पाटगाव

भुदरगडच्या नूतन सभापती आक्काताई प्रविण नलवडे यांनी आपल्या स्वनिधीचा वापर करून शाळेतील मुलांच्या सुरक्षिततेसाठी वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी डिजीटल सॅनिटायजर स्प्रे मशीन विद्या मंदिर बशाचामोळा यांच्यासह तालुक्यातील ४० शाळांना आपल्या निधीतून पुरवली आहे.

अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा यामध्ये उपलब्ध आहेत. मशीनजवळ केवळ हात धरताच ऑटोमेटिक हात सॅनिटायजरने क्लिन होतात. शिवाय शरीराचे तापमानही सहज समजते. चार्जिंग बॅटरीची अंतर्गत सोय असलेने ४८ तास याचा बॅकअप राहतो. शिवाय याचा हॅण्डवाश मशीन म्हणूनही वापर करता येतो. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असे साधन आहे.

शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला सभापती



पाटगाव : विद्या मंदिर बशाचा मोळा येथे सॅनिटायझर स्प्रे मशीन देताना सभापती सौ. आक्काताई नलवडे व इतर.

नलवडे यांनी विद्या मंदिर बशाचामोळा या लोकसहभागातून उत्कृष्ट कार्य केलेल्या शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन सदर साहित्य प्रदान केले. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांच्याकडून आक्काताई नलवडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नलवडे यांनी शाळेचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी केले. या कार्यक्रमास प्रविण नलवडे, सरपंच निशा संकपाळ, शिवाजी संकपाळ, आनंदा ढोकरे, विश्वनाथ पाटील, संतोष पाटील, पांडुरंग पाटील, संतोष संकपाळ, अनिल अमृते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आभार दिग्विजय कोटकर यांनी मानले.

**दैनिक तरुण भारत १७ जून २०२१**

## बशाचामोळा शाळा बनली स्मार्ट स्कूल

### तालुक्यातील स्मार्टबोर्डयुक्त पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा

कडगाव, ता. १८ : बशाचामोळा (ता. भुदरगड) येथील प्राथमिक शाळा स्मार्ट स्कूल बनली आहे. मुंबई येथील रश्मीज् स्माइल ट्रस्टने शाळेस स्मार्ट बोर्ड (टचस्क्रीन बोर्ड), प्रोजेक्टर, संगणक संच व इतर उपयुक्त शैक्षणिक साहित्य दिले. स्मार्टबोर्ड सुविधा असणारी तालुक्यातील पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा आहे.

सध्या शाळा व शिक्षण स्मार्ट होत आहे. अनेक शाळांत डिजिटल स्मार्ट बोर्ड बसवले आहेत; पण याकरिता मोठ्या आर्थिक साहाय्याची आवश्यकता असते. भुदरगड तालुक्यात अद्याप कोणत्याही जिल्हा परिषद शाळेत अशी सुविधा नाही; परंतु बशाचामोळा येथे पहिली ते



बशाचामोळा : शाळेस भेटवस्तू देताना रश्मीज् स्माइल ट्रस्टचे सदस्य.

चौथीपर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेत ही स्मार्ट बोर्ड सुविधा प्राप्त झाली. रश्मीज् स्माइल ट्रस्टतर्फेशाळेसाठी व मुलांसाठी नवीन दप्तरे, पुस्तके व इतर उपयुक्त साहित्य असे एक लाख वीस हजार किमतीचे साहित्य भेट दिले.

मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संभाजी पाटील, डॉ. भावना कुचेरिया, डॉ. सुहास कुचेरिया, भावना शहा, धरमशी पटेल, हिना पटेल, दीपा ठक्कर यांचे सहकार्य लाभले.

सरपंच निशा संकपाळ, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विश्वनाथ पाटील, एकनाथ पाटील, आनंदा ढोकरे, संतोष पाटील, मारुती पोवार, पांडुरंग पाटील, व्ही. एम. पाटील, अक्षय पाटील आदी उपस्थित होते. दिग्विजय कोटकर यांनी आभार मानले.

**दोन लाखांहून अधिक मदत**

मुख्याध्यापक सचिन देसाई हे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांनी लॉकडाउन काळात केलेल्या कौतुकास्पद कार्याचा आदर्श राज्यभरातील शिक्षक घेत आहेत. देशभरातून अनेक शिक्षकांनी या शाळेस स्वेच्छेने दोन लाखांहून अधिक मदत पाठवली आहे.

**दैनिक सकाळ १८ ऑगस्ट २०२१**

## ▪ शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान व सन्मान

- शासन पुरस्कृत **'शिक्षण माझा वसा युवा शिक्षक पुरस्कार'** (2018)
- केंद्रीय शिक्षा आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय च्या **राष्ट्रीय आय.सी.टी.टीचर अवार्ड** साठी नामांकन (2018)
- कोरोना काळात देशातील सर्वाधिक लोकसहभागद्वारे कायपालट करून **बशाचामोळा ही द्विशिक्षकी व 14 वर्षे वापरात नसलेली शाळा राज्यासाठी ग्रामीण भागातील सरकारी रोल मॉडेल स्कूल** बनवली आहे. संपूर्ण देशभरातून निधी प्राप्त झालेली शाळा. (2021-2022)
- शासनाच्या **दीक्षा ॲप साठी इ-साहित्य निर्मितीत योगदान.** (2018)
- **राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय शिक्षक कार्यशाळेमधून शिक्षकांना प्रशिक्षण** देण्याचे कार्य.. (2018)
- शैक्षणिक **ब्लॉग व YOUTUBE CHANNEL निर्मिती राज्यभरात वापर.** नॉलेज ब्रिज द्वारा 'MAHARASHTRA BEST EDU. YOUTUBE CHANNEL AWARD प्राप्त.
- मराठी वाचन लेखन सुलभता यासाठी **'शब्दतारका डिजिटल प्रोजेक्ट'** ची निर्मिती. मराठी वाचनासाठी सर्वाधिक वापरात असलेला प्रोजेक्ट .
- 200 पेक्षा अधिक शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती, शिवाय मुलांच्या करिता अनेक **शैक्षणिक डॉक्युमेंटरी** ची निर्मिती.
- राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत प्रथम क्रमांक. 2018
- शिक्षक रत्न, सुपर 30 टीचर सन्मानसह अनेक समाजसेवी संस्था कडून गौरव.
- **'पक्का पाया पाहिलींचा जाणीव पहिला आकार देताना '** या नवोपक्रमास शासन पुरस्कार (2022)
- ज्ञानामृत व्यासपीठ, नेसरी मार्फत राज्यस्तरीय सरसेनापती आदर्श शिक्षक पुरस्कार